मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | मुंबई, शनिवार, १७ ऑगस्ट २०२४ | वर्ष- २९ | अंक - ५८ | पाने- ८
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



मुख्यमंत्री शिंदेंसाठी लाडक्या बहिणीने मंगळसूत्र मोडून पाठवली सोन्याची राखी
पान ६

# मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करा...

## ठाकरेंच्या मागणीमुळे 'मविआ'त पेच

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण? उद्धव ठाकरे होणार का? असा प्रश्न महायुतीतील नेते विचारत आहेत, पण पृथ्वीराज चव्हाण किंवा शरद पवार यांनी आज मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करावा, माझा पाठिंबा असेल, असं खुलं आव्हान शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिलं. महाविकास आघाडीच्या प्रचाराचा नारळ आज षणमुखानंद सभागृहात



वाढवण्यात आला. यावेळी उद्धव ठाकरेंनी थेट सलामीला येऊन 'सिक्सर'च लगावला.

सरकारला आता जाग आली आहे, ते डुबक्या मारत आहेत की पवित्र होता येईल का बघत आहेत. स्वतःचे फोटो सगळीकडे छापत आहेत. पण तुम्ही उमेदवारी मला मिळाली नाही तरी चालेल पण यांना खाली खेचू, असं बघा. युतीत बसून काड्या करणारे खूपजण आहेत. सगळे सारखे विचारतायत,मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण? उद्धव ठाकरे होणार का? माझं पृथ्वीराज बाबा किंवा शरद पवार यांना सांगणं आहे, की मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करा, माझा पाठिंबा असेल. आताच्या आता जाहीर करा, आम्ही पाठिंबा देतो, असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

युतीत असताना ज्याच्या जागा जास्त येतील, त्याचा मुख्यमंत्री हे धोरण होतं. पण यामुळे एकमेकांच्या पायावर धोंडा पाडण्यात वाया घालवली. कारण युतीत आपापसात स्पर्धा लागायची आमचे आमदार जास्त यावे, म्हणून त्याचे पाडा याची. आज मुंबईत मी यजमानपद स्वीकारत ओपनिंग प्लेयर व्हायचं ठरवलं, असंही ठाकरे म्हणाले. मात्र ठाकरेंच्या आजच्या थेट सिक्सरवर मविआच्या नेत्यांनी चुप्पी साधली आहे. ठाकरेंच्या या मागणीमुळे 'मविआ'त काहीसा पेच निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

### *संविधानावरील संकट अजूनही गेलेले नाही!*

*मविआच्या निर्धार मेळाव्यात राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार म्हणाले की, आपण स्वातंत्र्य दिवस साजरा केला. उद्याची महाराष्ट्राची दिशा काय राहणार आहे? महाराष्ट्रावर जे काही संकट आहे त्यातून राज्याची सुटका कशी करता येईल? हे लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी ही सभा आहे. महाराष्ट्राचा विचार तर करावाच लागेल. मात्र, देशावरच संकट अद्याप गेलेले नाही. लोकसभेला आपण संविधान बदलण्याबाबत भूमिका मांडली होती. संविधानावरील संकट अजूनही गेलेले नाही. कारण आत्ताच जे सरकार आहे. त्यांची जी विचारधारा आहे त्यामुळे संविधान अडचणीत असल्याचे पवारांकडून यावेळी सांगण्यात आले. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधत म्हटले की, नुकत्याच झालेल्या अधिवेशनात पंतप्रधान एक दिवसही सभागृहात आले नाहीत.*

# वादग्रस्त विधानामुळे नाशिक, नगर, संभाजीनगरात तणाव

## वाद निर्माण करणाऱ्या रामगिरींच्या व्यासपीठावर मुख्यमंत्र्यांची उपस्थिती, तर्क-वितर्कांना उधाण

**प्रतिनिधी**
**नाशिक/संभाजीनगर**

मुस्लिम समाजाच्याबाबतीत वादग्रस्त विधान करणारे महंत रामगिरी महाराज यांच्यावर नाशिकमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. तर दुसरीकडे अहमदनगर व छत्रपती संभाजीनगरात पोलिस ठाण्यांसमोर तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्या महाराजांवर पुन्हा गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावे, अशी मागणी केली गेली.

एकीकडे राज्यात महंत रामगिरी महाराजांच्या विधानाने तणावाची स्थिती निर्माण झालेली असताना





दुसरीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाशिकमध्ये दाखल झाले असून त्यांनी महंत रामगिरी महाराज यांची भेट घेतली आहे. तर धार्मिक सोहळ्याच्या कार्यक्रमात हे दोन्ही मान्यवर एकाच व्यासपिठावर दाखल झाले होते.

अखंड हरिनाम सप्ताहाच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री शिंदे आणि महंत रामगिरी महाराज या ठिकाणी एकत्र आले. यावेळी शिंदे म्हणाले की, पंढरपूरला मी जेव्हा जेव्हा जातो. तेव्हा मला खूप आनंद होतो. पांडुरंगाचे वारकऱ्यांना कुठेही गैरसोय होऊ नये, यासाठी मी यात्रेच्या आठ दिवसांपूर्वीच पंढरपूरात दाखल झालो. तेथील सर्व सुविधा केल्या. आषाढी व कार्तिक वारीला सर्व सुविधा देण्याचे काम मी एक मुख्यमंत्री म्हणून नाहीतर एक पांडुरंगांचा वारकरी म्हणून देण्याचा प्रयत्न केला, असेही शिंदे म्हणाले.

सरला बेटाच्या महंतांनी अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा कायम ठेवली. गंगागिरी महाराज यांचे काम पुढे नेणारे रामगिरी महाराज यांचे मी कौतुक करतो, त्यांना धन्यवाद देतो. येथील हरिनाम सप्ताहाची नोंद गिनिज बुकात नोंद झाली आहे. त्यामुळे गिनिज बुकाचीच उंची वाढली आहे, असेही शिंदे म्हणाले. तर पुढे बोलताना त्यांनी शासनाच्या योजनांबाबत माहिती दिली व विरोधकांवर देखील जोरदार हल्लाबोल केला.

### *संभाजीनगर, नगरमध्ये तणावाची स्थिती*

*सरला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांनी एका धर्माविषयी केलेल्या वादग्रस्त विधानाचे शुक्रवारी छत्रपती संभाजीनगरसह वैजापूर तथा अहमदनगरमध्येही तीव्र पडसाद उमटले. संभाजीनगर येथील सिटी चौक पोलिस ठाण्यापुढे हजारो नागरिकांचा जमाव जमला आहे. यामुळे या भागात मोठा तणाव निर्माण झाला आहे. खबरदारी म्हणून या परिसरातील दुकाने बंद करण्यात आली आहे. तसेच मोठा बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे. जमावाने रामगिरी महाराजांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.*

## म ह त्त्वा चे

### इस्रोचे बेबी रॉकेट लाँच



**श्रीहरीकोटा :** भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) ने देशातील सर्वात लहान रॉकेट SSLV-D3 वर श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून पृथ्वी निरीक्षण उपग्रह-8 (EOS-08) प्रक्षेपित केले. हा उपग्रह पृथ्वीच्या कक्षेबाहेर सुमारे 475 किमी अंतरावर स्थापित केला जाईल. हे एक वर्ष काम करेल. EOS-08 उपग्रहाचा उद्देश पर्यावरण आणि आपत्तीबाबत अचूक माहिती देणे हा आहे. यापूर्वी इस्रोने प्रक्षेपणाची तारीख 15 ऑगस्ट निश्चित केली होती. त्यानंतर एका दिवसानंतर ते सुरू करण्यात आले.

### गोव्यात जागोजागी अमली पदार्थ मिळतात

#### भाजपच्या मंत्र्याच्या वक्तव्याने वाद

**पणजी :** गोव्याचे कायदा मंत्री एलेक्सो सिकेरा एका वादग्रस्त वक्तव्यामुळे सध्या चर्चेत आले आहेत. त्यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे वाद निर्माण झाला आहे. गोव्यात जागोजागी अमली पदार्थ विकले जात आहेत आणि त्यांच्यावर कारवाई होत नाही, असे एलेक्सो सिकेरा म्हणाले. त्यांच्या या वक्तव्याने त्यांच्याच सरकारवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या वक्तव्यावर आता पडदा टाकत गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी 'स्लिप ऑफ टंग' म्हटले आहे. सनबर्न फेस्टिव्हल यंदा दक्षिण गोव्यामध्ये आयोजित केला आहे. हा फेस्टिव्हल ड्रग संस्कृतीला चालना देत असल्याची त्याच्यावर टीका होत असते.

# महाराष्ट्र विधानसभा निवडणुका लांबणीवर

## जम्मू-काश्मीर, हरियाणाच्या निवडणूका जाहीर | 4 ऑक्टोबरला निकाल

**प्रतिनिधी**
**नवी दिल्ली**

केंद्रीय निवडणूक आयोगानं (ECI) शुक्रवारी हरियाणा तसंच जम्मू-काश्मीरमधील आगामी विधानसभा निवडणूक मतदानाच्या तारखा जाहीर केल्या आहेत. जम्मू-काश्मीरमध्ये तीन टप्प्यात निवडणुका होणार असून पहिला टप्पा 18 सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. दुसरा टप्पा 25 सप्टेंबरला आणि शेवटचा टप्पा 1 ऑक्टोबरला होणार आहे. या निवडणुकांचे निकाल 4 ऑक्टोबरला जाहीर होणार आहेत.

हरियाणा विधानसभा निवडणुका 1 ऑक्टोबरला एकाच टप्प्यात होणार आहेत.



जम्मू-काश्मीरच्या दुसऱ्या टप्प्यात श्रीनगर, गंदरबल, पुंछ, राजौरी आणि रियासी या मतदारसंघात निवडणूक होणार आहे. शेवटच्या टप्प्यात उत्तर काश्मीर, उधमपूर, जम्मू आणि कठुआ या केंद्रशासित प्रदेशात मतदान होईल. मतदानाच्या तारखांची घोषणा करताना मुख्य निवडणूक आयुक्त (CEC) राजीव कुमार म्हणाले की, संपूर्ण केंद्रशासित प्रदेशात शांततापूर्ण निवडणुकांसाठी पुरेशी सुरक्षा व्यवस्था केली जाईल.

उल्लेखनीय म्हणजे, हरियाणा, महाराष्ट्र, झारखंड या तीन राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. हरियाणा तसंच महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ अनुक्रमे 3 नोव्हेंबर तसंच 26 नोव्हेंबर रोजी संपणार आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांबाबत मुख्य निवडणूक आयुक्त म्हणाले, झारखंड आणि महाराष्ट्र या दोन राज्यातील निवडणुका जम्मू काश्मीर तसंच हरियाणा राज्यातील निवडणुका पार पडल्यावर होतील. 2014 पासून जम्मू आणि काश्मीरमध्ये निवडणुका झाल्या नाहीत.

# ...तर विनेश फोगाटचा मृत्यू झाला असता

## कोचकडून धक्कादायक खुलासा

**नवी दिल्ली**

भारताची कुस्तीपटू विनेश फोगाटच्या अंतिम सामन्याच्या आदल्यादिवशी काय घडलं याबाबत मोठा खुलासा झाला आहे. विनेशने तिच्या स्पर्धेच्या पहिल्या दिवशी नियमानुसार तीन सामने जिंकत अंतिम फेरीतील प्रवेश पक्का केला. पण या तीन सामन्यानंतर तिचं वजन वाढलं होतं. याबाबत तिचे प्रशिक्षक वॉलर ऍकोस यांनी एक पोस्ट केली होती. या पोस्टमध्ये एक खुलासा करण्यात आला होता. परंतु काही वेळानंतर ती पोस्ट डिलिट करण्यात आली होती. त्यात त्यांनी एका क्षणी विनेशचा जीव जाईल, असं वाटलं होतं, अशी पोस्ट प्रशिक्षकाने केली.

पोस्टमध्ये त्यांनी हंगेरी भाषेत



डिटेल्स लिहिल्या होत्या. 'उपांत्य सामन्यानंतर 2.7 किलो वजन वाढलेलं होतं. त्यासाठी आम्ही 1तास 20 मिनिटे व्यायाम केला. पण तरी दीड किलो वजन बाकी होतं. त्यानंतर 50 मिनिट विनेशने सौआना (Sauna) केल्यानंतरही तिला फारसा घाम आला नव्हता.

'आमच्याकडे काहीही पर्याय नव्हता. यानंतर मध्यरात्रीपासून पहाटे 5.30 पर्यंत तिने वेगवेगळ्या कार्डिओ मशीनवर वेळ घालवला. कुस्तीचे डावपेच खेळले. यादरम्यान तिने 2-3मिनिटेच आराम केला असणार, त्यानंतर तिने पुन्हा व्यायामाला सुरुवात केली. ती एका क्षणी खाली कोसळलेली. पण कसंबसं आम्ही त्यातून सावरलो. यानंतर ती सौआनामध्ये एक तासभर होती. मी हेतुपूर्वक नाट्यमय लिहित नाहीये, पण मला एक चांगलं आठवतंय एका क्षणी माझ्या मनात विचार आलेला तिचा कदाचीत जीव जाईल.' असं प्रशिक्षक पोस्टमध्ये म्हणाले होते.

# राहुल गांधी भारतीय नाहीत सुब्रमण्यम स्वामींचा पुन्हा दावा

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

काँग्रेसचे नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नागरिकतेवरुन पुन्हा एकदा भाजपच्या सुब्रमण्यम स्वामी यांनी सवाल उपस्थित केले आहेत. आता थेट राहुल गांधी यांच्याविरोधात सुप्रीम कोर्टात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे असे सुब्रमण्यम स्वामी यांनी ट्वीट करत जाहीर केले आहे. सुब्रमण्यम स्वामी यांचे सहकारी वकील सत्य सभरवाल यांनी गांधींविरोधात याचिका दाखल केली



**सुप्रीम कोर्टात याचिका**

आहे. साधारण एक आठवड्यापूर्वीच राहुल गांधी भारतीय नसल्याचा दावा सोशल मीडियावर पोस्ट करत सुब्रमण्यम स्वामी यांनी केला होता.

सुब्रमण्यम स्वामी यांचे सहकारी वकील सत्य सभरवाल यांनी याचिकेत म्हटले आहे, राहुल गांधी यांची युकेस्थित कंपनी आहे जिचे नाव बॅकऑपस.लिमिटेड असे आहे. याच कंपनीत राहुल गांधी डायरेक्टर आहेत. 10 ऑक्टोबर 2005 साली याच कंपनीत राहुल गांधींनी ब्रिटीश नागरिक म्हणून आयटी रिटर्न भरला आहे. स्वामींचे वकील सभरवाल म्हणाले, राहुल गांधींनी भारतीय नागरिकत्व कायदाचे उल्लघंन केले आहे असे याचिकेत नमूद केले आहे. गृहखात्याने प्रकरण गांभीर्याने घेत राहुल गांधींची चौकशी केली पाहिजे अशी मागणी सुद्धा स्वामी यांनी केली आहे.

स्वामी म्हणाले होते की राहुल गांधी भारतीय नाहीत आणि मोदी तसेच केंद्राचे गृहखाते याविरोधात कोणतीही कारवाई करत नाही असे म्हणत त्यांनी सरकारविरोधात नाराजी व्यक्त केली. तसेच,सोनिया गांधी मोदी शाहांना ब्लॅकमेल करतायत का? असा सवाल सुद्धा स्वामींनी उपस्थित केला आहे. साधारण 2017 साली राहुल गांधी यांच्या नागरिकतेवर सुब्रमण्यम स्वामी यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केला होता.

# आता जगभर युद्ध भडकणार

## रशियाच्या खासदाराचं धक्कादायक विधान

**वृत्तसंस्था**
**मॉस्को**

दोन वर्षांपूर्वी रशियाने युक्रेनवर हल्ला चढवला होता. गेल्या दोन वर्षांपासून युक्रेनने रशियाला कडवी झुंज दिली. त्यानंतर आता पहिल्यांदाच युक्रेनने रशियाच्या कुर्स्क प्रदेशात शिरकाव केला आहे. 6 ऑगस्टपासून युक्रेनने आघाडी घेतली असून रशियन सैन्याला मागे सारले आहे. त्यामुळे रशियाला या भागातून दोन लाखांहून अधिक नागरिकांना बाहेर काढावे लागले आहे. यानंतर आता रशियाचे खासदार मिखाईल शेरेमेट यांनी जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर पोहोचले असल्याचे मोठे विधान केले आहे.

युक्रेनने पाश्चिमात्य देशांच्या पाठिंब्यावर रशियात घुसखोरी केली असून यामुळे जगात आता तिसऱ्या महायुद्धाचा धोका निर्माण झाला आहे, असे विधान शेरेमेट यांनी केले.

# अन्यायाविरुद्धच्या लढाईत देश तुमच्यासोबत...

## गांधींच्या केजरीवालांना वाढदिवसाच्या शुभेच्छा

**नवी दिल्ली**

*दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आपचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांचा आज वाढदिवस होता. अरविंद केजरीवाल 56 वर्षांचे झाले आहेत. दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी एक्सवर खास पोस्ट शेअर करत अरविंद केजरीवाल यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.*

*राहुल गांधी यांनी आपल्या एक्स अकाउंटवर लिहीले की, आशा करतो की तुम्ही निरोगी आणि आनंदी राहा. अन्यायाविरुद्धच्या या लढतीत देश तुमच्यासोबत आहे. आपच्या कार्यकर्त्यांनी तिहार तुरुंगाच्या बाहेर संयोजक आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा वाढदिवस साजरा केला. अनेक कार्यकर्ते एकत्र जमून त्यांनी केजरीवाल यांच्या फोटोसमोर केक कापला आणि एकमेकांना भरवला.*

# 70 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा

## 'वाळवी' सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट, 'कांतारा' सर्वोत्कृष्ट चित्रपट



**प्रतिनिधी**
**नवी दिल्ली**

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची शुक्रवारी घोषणा करण्यात आली. यामध्ये मनोज वाजपेयी आणि शर्मिला टागोर यांचा चित्रपट गुलमोहर सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट म्हणून निवडला गेला आहे. 'कांतारा'साठी ऋषभ शेट्टीला सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून निवडण्यात आले आहे. 2022 मध्ये प्रदर्शित झालेल्या सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठी 'कांतारा'ची निवड करण्यात आली आहे. नित्या मेनन, मानसी पारेख यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला आहे.

गेल्या वर्षी अल्लू अर्जुनला पुष्पा या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला होता. हा सन्मान मिळवणारा अल्लू हा पहिला तेलगू अभिनेता होता. गंगूबाई काठियावाडीसाठी आलिया भट्ट आणि मिमीसाठी कृती सेनन यांना संयुक्तपणे सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला.

| | |
|---|---|
| सर्वोत्तम अभिनेता | ऋषभ शेट्टी |
| सर्वोत्तम अभिनेत्री | नित्या मेनन, मानसी पारेख |
| सर्वोत्कृष्ट चित्रपट | कांतारा |
| सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री | नीना गुप्ता |
| सर्वोत्कृष्ट फीचर फिल्म | अट्टम |
| सर्वोत्तम दिग्दर्शक | सुरज बडजात्या |
| सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट | गुलमोहर |
| सर्वोत्कृष्ट सिनेमॅटोग्राफी | मोनो नो अवेयर |
| सर्वोत्कृष्ट संगीत पुरस्कार | विशाल शेखर |
| सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट | वाळवी |
| सर्वोत्कृष्ट तेलुगु चित्रपट | कार्तिकेय 2 |

वृत्तमानस
पालघर, मुंबई
मुंबई, शनिवार, १७ ऑगस्ट २०२४

## चिंचोटी-भिवंडी रस्त्याचा चेंडू पालकमंत्र्यांच्या दरबारात

**वसई :** सध्या सर्वत्र चर्चेचा विषय असलेल्या चिंचोटी भिवंडी या राज्यमार्गाची डागडुजी करून सदर रस्ता वाहने चालविण्याजोगा व्हावा यासाठी मा.नगरसेविका प्रीती दिनेश म्हात्रे व कामणचे मा.सरपंच दिनेश म्हात्रे.यांनी शुक्रवारी पालघरचे पालकमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांची भेट घेऊन सदर जीवघेणा रस्ता लवकरात लवकर लोकांना व वाहन चालकांना खड्डेमुक्त करुन देण्याचे निवेदन दिले. यावेळी पालकमंत्री चव्हाण यांनी ताबडतोब त्यांच्या सचिवामार्फत चिंचोटी-भिवंडी रस्त्यासंदर्भात माहिती मागवून, तो ताबडतोब दुरुस्त कसा करता येईल यासाठी आशादायक पाऊले उचलली. गेली कित्येक वर्षापासून चिंचोटी भिवंडी राज्यमार्गाची दुरावस्था झाली आहे. प्रीती म्हात्रे व दिनेश म्हात्रे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह अनेकदा तीव्र आंदोलने केली आहेत. तसेच यापुर्वी विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री संजय राठोड, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, मा.खासदार राजेंद्र गावीत,आदिवासी आढावा समिती अध्यक्ष विवेक भाऊ पंडित यांच्यासह अनेकांची भेट घेऊन रस्त्याच्या दुरावस्थाचे दाहक चित्र ऊभे केले होते. त्यानंतर शुक्रवारी पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित जनता दरबारात त्यांच्याशी चर्चा करून रस्ता सुधरवण्यासाठी लेखी निवेदन दिले.यावेळी त्यांनी नवीन रस्त्याचे टेंडर निघाले असल्याचे सांगितले.



## थोडक्यात

### जेष्ठ वृत्तपत्र विक्रेते विठोबा भोसले यांचे निधन



**मुंबई:** लोअर परळ येथील ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते आणि राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे माजी प्रतिनिधी विठोबा भोसले यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. विविध सामाजिक उपक्रमात ते हिरीरीने सहभाग घेत असत. बृहन्मुंबई वृत्तपत्र विक्रेता संघाचे विश्वस्त जीवन भोसले यांचे ते वडील होते. त्यांच्या अंत्ययात्रेत विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच वृत्तपत्र विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांचा दशक्रिया विधी व प्रतिमा पूजन मंगळवार, २० ऑगस्टला मुंबई येथे होणार आहे.

### दहिसरमध्ये सुबोध चितळे सादर करणार एकपात्री कार्यक्रम

**मुंबई:** मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय दहिसर शाखेच्यावतीने साहित्यसम्राट पु.ल.देशपांडे यांच्या "असा मी असा मी" या पुस्तकावर आधारीत मनोरंजन बुस्टर हा एकपात्री कार्यक्रम मराठी मालिका अभिनेते सुबोध चितळे सादर करणार आहेत. रविवार 18 ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेपाच वाजता हा कार्यक्रम ग्रंथालय सभागृह, नानासाहेब धर्माधिकारी समाजकल्याण केंद्र, दुसरा मजला,विठ्ठलमंदिर जवळ, दहिसर ( पश्चिम) येथे होईल तरी रसिकांनी या कार्यक्रमास अवश्य उपस्थित रहावे अशी विनंती ग्रंथालयाच्या दहिसर शाखेचे अध्यक्ष रमाकांत पाटील यांनी केली आहे.

### बांग्लादेश अत्याचार विरोधात रविवारी मानवी साखळी

**वसई:** बांग्लादेशात होणा-या अत्याचार विरोधात रविवारी वसईत मानवी साखळी चे आयोजन करण्यात आले आहे. बांग्लादेशात हिंदुंवरील अत्याचार वाढत चालले आहेत,मंदिर आणि घरांवर हल्ले करुन महिलांची विटंबना केली जात आहे. या घटनेच्या निषेधार्थ मानवी साखळीचे १८ ऑगस्टला सायंकाळी ५ वाजता नायगाव,वसई, नालासोपारा आणि विरार मध्ये आयोजन करण्यात आले आहे.सर्व नागरिकांनी आपण राहत असलेल्या चौकाजवळ उपस्थित राहून मानवी साखळी करुन त्यात सहभागी व्हावे असे आवाहन जागृत हिंदु समाजाने केले आहे.

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## वसईचा पारंपरिक गड पुन्हा काँग्रेसकडे? मविआकडून काँग्रेसला जागा सोडणार?

# ठाकूरशाहीला यंदा काँग्रेसकडून आव्हान मिळणार...

प्रतिनिधी
■ वसई

दिवाळीनंतर महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुका जाहीर होण्याची शक्यता असून त्यादृष्टीने सर्वच पक्ष कामाला लागले आहेत. या धामधुमीत गेली कित्येक वर्ष वसईसारखा हितेंद्र ठाकूर यांच्या ताब्यात असलेला मजबुत गड शिवसेनेने लढवला. मात्र सन 2009 सालचा अपवाद वगळता या गडावर आपले निशाण फडकावण्यात सन 1990 नंतर शिवसेना व इतर घटक पक्षांना यश आलेले नाही. ठाकुरांचं मजबूत संघटन असलेल्या या बालेकिल्ल्याला धडक देण्यासाठी महाविकास आघाडीकडून यावेळेस काँग्रेस पक्षाला संधी देण्यात येणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे भाऊसाहेब वर्तक, ताराबाई वर्तक या काँगेसच्या मातब्बर चेहऱ्यांनी लढवलेल्या वसई पारंपरिक विधानसभा मतदारसंघावर वर्चस्व गाजवण्यासाठी काँग्रेस पक्ष रणांगणात आपला शिलेदार उतरवण्याच्या तयारित आहे; अशी चर्चा आहे.

महाविकास आघाडीच्या पालघर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार भारती कामडी यांनी वसई विधानसभा मतदारसंघात बहुजन विकास आघाडीच्या राजेश पाटील यांना मात दिली होती. त्यामुळे या विधानसभा मतदारसंघातून किल्ला लढवण्यासाठी काँग्रेसच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. दरम्यान, काँग्रेसला मानणारा मोठा वर्ग वसई पूर्व, पश्चिम परिसरात आहे. तसेच मुस्लीम बहुल भागही आता काँग्रेस पक्षाकडे आकृष्ठ होताना दिसत आहे. त्याचा फायदा वसईत विधानसभा मतदारसंघात काँग्रेसला होणार आहे.

वसई विधानसभा क्षेत्रात पावसाळ्यात उद्भवणारी पूर समस्या, अनधिकृत बांधकामं, पायाभूत विकासकामांच्या समस्या यामुळे वसईकर जनता स्थानिक बहुजन विकास आघाडी पक्षाविरोधात नाराज आहेत. त्याचाच फटका बविआला लोकसभा निवडणुकीत वसईत बसला. दरम्यान, महाविकास आघाडीकडून वसई विधानसभा मतदारसंघ काँग्रेसला सोडण्याच्या हालचाली सुरू असल्याची चिन्हे असून नालासोपारा मतदारसंघात ठाकरे गट बविआ व भाजपविरोधात मैदानात असेल. येथे ठाकरे गटाचे पंकज देशमुख यांना संधी मिळण्याची शक्यता आहे. तर वसई विधानसभा क्षेत्रात काँग्रेसकडुन विजय पाटील यांच्या नावाची चर्चा असली तरी पक्षांतराची पार्श्वभूमी असलेल्या विजय पाटील यांना पक्षातूनच समीर वर्तक, ओनिल आल्मेडा यांचे आव्हान असणार आहे. विजय पाटील यांना विधानसभेसाठी संधी असली तरी यावेळेस समीर वर्तक यांच्या नावाचाही आयत्या वेळेस विचार होऊ शकतो. असा राजकीय जाणकारांचा अंदाज आहे. तर वसई पश्चिमेतील ख्रिस्त चेहरा असलेल्या ओनिल आल्मेडा यांच्याही नावाची चर्चा होत आहे.

काँग्रेस कोणाला तिकीट देते ते पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. दरम्यान, पालघर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसची (शरद पवार गट) फार ताकद नसल्याने पालघरमधील सहा विधानसभा मतदारसंघांपैकी निम्म्या मतदारसंघातील ठाकरे गटाची ताकद पाहता ठाकरे गटाचे उमेदवार नालासोपारा, बोईसर, पालघर हे विधानसभा मतदारसंघ ठाकरे गट लढवू शकतो. तर विक्रमगड मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) विक्रमगड विधानसभा क्षेत्रात विद्यमान आमदार सुनिल भुसारा यांना पुन्हा शरद पवार गट संधी देईल, तर डहाणू मतदारसंघ काँग्रेस लढवू शकतो, असा राजकीय अंदाज आहे. या सर्वात लक्षवेधी ठरेल तो वसई विधानसभा मतदारसंघ. गतवेळेस शिवसेनेच्या विजय पाटील यांनी बविआला कडवी टक्कर दिली होती. आता ते सेनेतून काँग्रेस पक्षात आल्याने त्यांना काँग्रेसकडून संधी मिळेल का? असा सवाल उपस्थित होत आहे. सध्या विधानसभेसाठी वसईत काँग्रेसच्या मोर्चेबांधणीला वेग आला आहे. त्यामुळे वसई विधानसभा मतदारसंघ महाविकास आघाडी काँग्रेसला सोडेल अशी शक्यता आहे.



*मुंबई: शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शाखा क्र. ६७ व ६८ च्यावतीने डी एन नगर महापालिका शाळेतील 1500 विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले कार्यक्रमाचे आयोजन अंधेरी पश्चिम विधानसभा उपविभागप्रमुख, माजी नगरसेवक संजय पवार यांनी केले होते. कार्यक्रमाला विधानसभा समन्वयक सुनील खाबिया, मती रंजना पाटील, शाखा संघटक शाखा क्र 67 पूजा पाटील, शाखा क्र 68 प्रीती खारवी, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मुंबई अध्यक्ष राजू नेटके, युवासेना मुंबई समन्वयक विक्रांत परब, विभाग अधिकारी हितिक मांजरेकर, मुख्याध्यापक अरुण मढवी सर, सुभाष राठोड सर, ग्रा सं कक्षाचे मनोज पोईपकर, सुंदर पाटील, यश धुरी, राम कोळी, स्टिवन गोम्स, मीरा कांगडे, लक्ष्मी कोळी, दमयंती कवळे, मीना जाधव, पूजा सुंदर पाटील व शाळेचे शिक्षक उपस्थित होते.*

## भारताच्या स्वातंत्रदिनानिमित्ताने शिवसेना शाखा संयुक्तनगर येथे मोफत छत्री वाटप

■ नालासोपारा

उद्धव बाळासाहेब ठाकरे,संयुक्त नगर,शिवसेना विभाग क्रमांक ८च्या वतीने सामाजिक बांधिलकी जप आयोजक विभाग प्रमुख जितेंद्र हजारे यांच्य संकल्पनेतून गुरुवार दिनांक १५ऑगस्ट २०२४ रोज हिंदुस्थानच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त सकाळी ९ वाजता ध्वजारोहण झाल्या नंतर १० वाजता साई दत्त मंदिर, संयुक्त नगर,येथे भगवा सप्ताह म्हणून छत्री वाटपकार्यक्रम घेण्यात आला सदरहू कार्यक्रमात गरजू व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.माजी विरोधी गट नेता विजय करंगुटकर साहेब,शहर प्रमुख प्रदिप सावंत साहेब,शहर कार्यकारिणी सदस्य केशव जगदाळे,विभाग प्रमुख जितेंद्र हजारे,महिला उप-शहर संघटीका श्वेता सावंत,माजी उपविभाग प्रमुख प्रकाश शिंदे, उपविभाग प्रमुख चिमण सोलंकी,महिला उप-विभाग संघटीका रेवती मांडगुळकर,शाखा संघटीका जागृती गिरप,शाखा प्रमुख रविंद्र यादव, रामचंद्र ऱ्होटोल, विनोद पवार, संदिप चौरसिया, उप-शाखा प्रमुख चंद्रकांत केंजले,जैष्ठ शिवसैनिक गौऱ्या बुधकर, नारायण सावंत, विनोद राऊळ, सखाराम गुरव, जितेंद्र शिंदे, प्रदिप खोत, कार्यकर्ते शशिकांत कासेकर, शशिकांत खताते, प्रकाश फराटे,गटप्रमुख दिनेश गावणुक,शांताराम दयाळकर, इतर कार्यकर्ते उपस्थित होते.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपविभाग प्रमुख चिमणभाई सोलंकी यांनी केले.




## केंद्र शासनपुरस्कृत 10 इलेक्ट्रिक बसचे पालिकेने केले लोकार्पण

### कर्मचारी-अधिकाऱ्यांचा केला पदोन्नतीने सन्मान



प्रतिनिधी
■ वसई

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत खरेदी करण्यात आलेल्या ४० पैकी १० इलेक्ट्रिक बसचे लोकार्पण स्वातंत्र्यदिनाचे औचित्य वसई-विरार महापालिकेने केले.

आमदार हितेंद्र ठाकूर आणि क्षितिज ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या लोकार्पण कार्यक्रमाला पालिका अधिकाऱ्यांसह वसई-विरारमधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.विशेष म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज,नरवीर चिमाजी आप्पा आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पालिका मुख्यालयातील तैलचित्रांचे अनावरण ही यावेळी करण्यात आले.दरम्यान,पालिकेतील १६ अधिकारी आणि १० कनिष्ठ लिपिकांना आयुक्त अनिलकुमार पवार यांनी पदोन्नती प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.

त्यानंतर 'जनता दरबारा`तून सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या-अडचणी जाणून घेण्यात आल्या. त्यांच्या समस्यांचे निराकरण करतानाच; भविष्यात वसई-विरार शहरात राबविण्यात येणाऱ्या प्रकल्प आणि विकासकामांची माहिती लोकप्रतिनिधी आणि आयुक्तांनी उपस्थितांना दिली.सेवेत दाखल परिवहन सेवेतील इलेक्ट्रिक बसमधून सैर घडवून आणताना या बसची वैशिष्ट्ये त्यांनी पत्रकारांना समजावून दिली.

केंद्र सरकारच्या 'राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमां`तर्गत पालिकेच्या ताफ्यात येणाऱ्या ५७ इलेक्ट्रिक बसकरता १६ मार्च च्या ठरावाला प्रशासकीय मंजुरी मिळाली होती.त्यानुसार २० जुलै ते १३ ऑगस्ट २०२१ या कालावधीत ई-निविदा मागवण्यात आली होती. या बसपैकी पहिल्या टप्प्यातील ४० बसेस येत्या महिनाभरात आणण्यासाठी आयुक्त पवार प्रयत्नशील होते. त्याअनुषंगाने या बसची नमुना तपासणी २४ जुलै ला त्यांनी ओलेक्ट्रा ग्रीनटेक इंडिया कंपनीच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत हैदराबाद येथे केली होती.त्यातील १० बस पालिका सेवेत रुजू झाल्या आहेत. उर्वरित बस लवकरच दाखल होणार आहेत. या बस ध्वनी व वायुप्रदूषण करत नसल्याने वसई-विरारकरांचा प्रवास आरोग्यदायी व सुखकारक होईल, असा विश्वास आयुक्त अनिलकुमार पवार यांनी या वेळीही व्यक्त केला.

## शिरवलीत जागा बिनशेती दाखवून महसूल विभागाला लाखोंचा गंडा


### देवा ग्रुप फाऊंडेशनचा तहसील कार्यालयावर साखळी उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी
■ वसई

विरार पूर्वेतील शिरसाड-वज्रेश्वरी परिसरातील शिरवली येथील स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनीलगतचा भूखंड विकत घेऊन त्यावर नियमबाह्य माती तसेच डेंब्रिज भराव करून स्थानिकांच्या शेतीला अपाय करणाऱ्या परप्रांतीय इसमाविरोधात स्थानिक शेतकरी प्रचंड आक्रमक झाले आहेत. बाधित शेतकरी देवा ग्रुप या सामाजिक संघटनेच्या झेंड्याखाली सदर इसमाविरोधात आंदोलन पुकारण्याच्या तयारीत असल्याची माहिती देवा ग्रुप फाऊंडेशनचे विभाग अध्यक्ष निलेश दशरथ मोकाशी यांनी दिली आहे.

देवा ग्रुपचे विभाग अध्यक्ष निलेश दशरथ मोकाशी यांनी दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, गावमौजे शिरवली येथील सर्व्हे क्र.15/1, 15/2, 15/3 व 15/4 या भूखंडावर एका परप्रांतीय इसमाने काही एकर जागा विकत घेतली आहे. ती जागा भातलागवडीची असूनसुद्धा ती जागा बिनशेती दाखवून तेथे व्यवसायिक प्रयोजनार्थ बांधकामासाठी बेकायदेशीर माती भराव करण्यात आला आहे. संबंधित जागा बिनशेती दाखवून स्थानिक महसूल विभागाची घोर फसवणूक या इसमांकरवी करण्यात आली आहे. दरम्यान, या माती भरावामुळे लगतच्या शेतजमिनीचे अतोनात नुकसान झाले असून जागा विकत घेणाऱ्या इसमाचा मध्यस्थ इसम भगवती जैन हा स्थानिक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करत असल्याचा आरोप निलेश मोकाशी यांच्यासह शिरवलीतील बाधित शेतकऱ्यांनी केला आहे. या इसमाच्या सततच्या काणाडोळ्यामुळे स्थानिक शेतकरी नुकसानीच्या गर्तेत सापडले असून त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.





> परप्रांतीय इसमाने विकत घेतलेल्या भूखंडावर मोठ्या प्रमाणात माती व डेंब्रिज भराव करण्यात आला आहे. त्यामुळे लगतच्या आमच्या लागवडीयुक्त जमिनींचे अतोनात नुकसान झाले आहे. या जागेचा मध्यस्थ भगवती जैन हा आमच्या तोंडाला आश्वासनांची पाने पुसत आहे. त्याच्याविरोधात आम्ही देवा ग्रुप संघटनेच्यावतीने तहसिलदार कार्यालयावर लवकरच साखळी उपेषणाचे हत्यार उपसणार आहोत.
> **निलेश मोकाशी(विभाग अध्यक्ष, देवा ग्रुप फाऊंडेशन)**

सदर भूखंडावर अकृषिक बिनशेती प्रयोजन दाखवून सदर भूखंडावर मोठ्या प्रमाणात डेंब्रिज टाकण्यात आले आहे. महसूल विभागाने संबंधित भूखंडावर केवळ 4 फुटापर्यंत माती भराव करण्यास परवानगी दिलेली असताना जैन या मध्यस्थाकडून तेथे चक्क 6 फुटांपर्यंत माती व डेंब्रिज भराव करण्यात आला आहे. या बेकायदेशीर भरावामुळे स्थानिक शेतकऱ्यांच्या भातशेतीत पावसाचे पाणी शिरून भातशेतीचे लाखोंचे नुकसान झाले आहे. पाणी निचरा होण्यास या मध्यस्थ इसमाने थातुरमातूर नाला लगतच्या जमिनीत खोदला आहे. मात्र त्याचा फार लाभ शेतीला न झाल्याने उलट शेतीचे आणखीच नुकसान झाले असल्याचा आरोप निलेश मोकाशी यांनी केला आहे. याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी मध्यस्थ इसम भगवती जैन याच्याकडे अनेक वेळा नुकसान भरपाईसाठी मिन्नतवाऱ्या करूनही तो शेतकऱ्यांना नुकसान भरपाईसाठी सातत्याने टोळवाटोळवी करत आहे. सध्या शेतकऱ्यांच्या जमिनीतील भातशेतीचे मोठे नुकसान झाले असून दरवर्षी शेतकऱ्यांचे पावसाच्या पाण्यामुळे मोठे नुकसान होण्याचा धोका आहे. त्यामुळे स्थानिक गोरगरीब शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ ओढवणार असल्याची भिती निलेश मोकाशी यांनी व्यक्त केली आहे. याविरोधात देवा ग्रुप संघटनेने तहसिलदार कार्यालयावर साखळी उपोषणाचा इशारा दिला आहे.

## रिक्षाचालकांच्या आंदोलनाला पालिकेचा 'कात्रजचा घाट'

### आश्वासन देऊन पाठ फिरवणाऱ्या पालिकेविरोधात रिक्षाचालकांचा उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी
■ वसई

पावसाळ्यात पालिकेच्या दुर्लक्षामुळे अतीशय खराब झालेला रस्ता, इमारतींतील सांडपाणी आणि गटार नसल्याने पावसाचे पाणी साचून दुर्गंधी निर्माण होणाऱ्या परिसरात व्यवसाय करणाऱ्या रिक्षाचालकांनी दि.30 जुलै 2024 रोजी विविध राजकीय पक्ष, स्थानिक नागरिक यांच्या पाठिंब्याने वसई पूर्वेतील जूचंद्र नाका येथे पालिकेविरोधात रास्ता रोको आंदोलनाची हाक देत तब्बल दोन तास रस्ता रोखून धरला होता. रिक्षाचालकांचा संताप आणि स्थानिकांचा तसेच विविध राजकीय पक्षांचा पाठिंबा मिळाल्याने रास्ता रोको आंदोलन छेडण्यात आले होते. रिक्षाचालकांचा आक्रमक पवित्रा पाहून वालिव विभागाच्या प्र.सहा.आयुक्त मनाली शिंदे व महापालिकेचे बांधकाम अभियंता शिंगारे यांनी 15 दिवसांत सदर रस्ता दुरूस्त करण्याचे आश्वासन रिक्षाचालकांना दिले होते. मात्र तीन, चार ठिकाणीच रस्त्याच्या कामाला हात लावणाऱ्या पालिकेविरोधात रिक्षाचालक संतप्त झाले असून त्यांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

नायगाव पूर्वतील नायगाव ते बापाणे या रस्त्याची यंदाच्या पावसाळ्यात दयनीय अवस्था झाली आहे. या रस्त्यावरून व्यवसाय करणाऱ्या रिक्षाचालकांना त्यामुळे व्यवसाय करणे कठीण होऊन बसले आहे. तसेच आजूबाजूच्या इमारतींतील सांडपाणी थेट रस्त्यावर येत असल्याने दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर साचून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर येणे, या समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी रिक्षाचालकांनी 30 जुलै रोजी रिक्षाबंद करत दोन तास रास्ता रोको आंदोलन केले होते. रिक्षाचालकांच्या आंदोलनाला पालिकेच्या वालीव विभागाने कात्रजचा घाट दाखवल्याची भावना रिक्षाचालकांत आहे. त्यामुळे जुचंद्र रिक्षा चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष एकनाथ पाटील यांनी पालिकेला आमरण उपाषणाचा इशारा दिला आहे.

**संत गाडगे महाराज एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**रजि नं. एम.यू.ए.एम/एस.आर.ए./एच. एस.जी./ (टीसी) १२०७०/२०११**
**संत गाडगे महाराज एस आर गृहनिर्माण संस्था मर्या. एन. जी. आचार्य मार्ग, खारदेवनगर, चेंबुर, (पूर्व) मुंबई ४०००५१**
**दिनांक : १७/०८/२०२४**

मृत्युपश्चात त्यांची पत्नी, श्रीमती यमुनाबाई गंगाराम डोके त्यांच्या नावे सदनिका हस्तांतरीत करणे व संस्थेचे सभासद करून घेण्याकरीता संस्थेकडे लेखी अर्ज केला आहे.

मयत सभासद सदनिकाधारक व त्यांची अर्जदार वारसाची सूचना

| अ. क्र. | रूम नं. | मयत सभासदाचे नाव | अर्जदार वारसाचे नाव | नाते |
|---|---|---|---|---|
| १. | ५०८ | कै. गंगाराम सावळेराम डोके | श्रीमती यमुनाबाई गंगाराम डोके | पत्नी |

संत गाडगे महाराज एस आर ए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.

| (सही) | (सही) | सही |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |



*मुंबई : रामनिरंजन झुनझुनवाला कॉलेज चे ट्रस्टी हिंदी भाषा प्रचार समिती चे सरचिटणीस आणि शिक्षण क्षेत्रातील समाजसेवक आणि यशस्वी उद्योजक डॉ राजेंद्र सिंह यांची आज घाटकोपर येथील त्यांच्या कार्यालयात साप्ताहिक स्टार महाराष्ट्र चे संपादक हेमंत रणपिसे यांनी सदिच्छा भेट घेतली. साप्ताहिक स्टार महाराष्ट्र चा अंक त्यांना सप्रेम भेट दिला.*

## महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या विरोधात आज दादर स्थानकाबाहेर आंदोलन

**मुंबई:** देशात महिलांवरील अन्याय अत्याचाराच्या घटनात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्याच्या विरोधात आज संध्याकाळी ४.३० वाजता AIDWA, SFI, DYFI, वर्किंग वुमेन्स कोऑर्डिनेशन कमिटी (CITU), जाति अंता संघर्ष समितीच्यावतीने दादर (पूर्व) स्थानकाबाहेर संयुक्त आंदोलन करणार आहेत. कोलकात्याच्या के आर. जी कर रुग्णालयात ८ ऑगस्टच्या रात्री हॉस्पिटलमध्ये शिकणाऱ्या एका डॉक्टरची काम संपवून आराम करत असताना तिच्यावर बलात्कार करून निर्घृण हत्या करण्यात आली. वसईत एका मुलीची भरदिवसा भर रस्त्यात हत्या, उरणमध्ये एका मुलीची निर्घृण हत्या, तर दुसऱ्या मुलीवर हल्ला, नवी मुंबईत सासरच्या मंडळींच्या त्रासामुळे मंदिरात गेलेल्या महिलेवर सामूहिक बलात्कार झाला. या विरोधात बाहेर पडायला हवे असे वाटते. म्हणून हे आंदोलन करण्यात येत असल्याचे सुगंधी फ्रान्सिस आणि रेखा देशपांडे या कार्यकर्तीनी केले आहे. सर्व व्यक्ती आणि संस्थांना या निदर्शनात सहभागी होऊन आपला निषेध व्यक्त करावा. असे आवाहन या संस्थांनी केले आहे. संपर्क 9223585524,9167029844.

### जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, श्री रवींद्र चंद्रकांत शिंदे रा. बी/१०४, गंधार अपार्टमेंट, विवा स्वर्गांगा कॉम्प्लेक्स, बोळींज रोड, विरार (प), ता. वसई, जि. पालघर, ४०१३०३, यांनी त्यांचे मालकीची व कब्जेवहीवाटीची गाव मौजे वाघोली, तलाठी सजा नवाळे, तालुका वसई, जिल्हा पालघर येथील मिळकत पर्डी नं. 2 क्षेत्र हे.आर ०.०७.१ पोट खाराबा ०.०३.० एकूण क्षेत्र हे. आर. ०.१०.१ पैकी क्षेत्र ०.०५.१ ही मिळकत माझे अशिलांस कायमची विकण्याचे मान्य व कबूल केले आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाही इसमांचा, व्यक्तीचा, संस्थेचा, गहाण, दान, दावा, वारसा, वहिवाट, विश्वस्त,बोजा, विक्री, कुळाराग, अदलाबदल वा अन्य हक्क, हितसंबंध असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत निम्नस्वाक्षरिकारांना त्यांच्या शोप नं. ७, प्रथमेश ड्रीम्स, रॉयल गार्डन, अगरवाल लाईफस्टाईल शेजारी, ब्रूकलिन पार्क जवळ, ग्लोबल सिटी, विरार (प), तालुका वसई, जिल्हा पालघर या पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह कळवावा. अन्यथा तसा हक्क हितसंबंध नाही, असे समजून विक्रीचा व्यवहार पुरा केला जाईल.

**खरेदीदारांचे वकील**
**(ॲड. दिनेश नाना आदमणे)**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई यांचे कार्यालय**
**(महसूल शाखा)**
किल्लाबंदर रोड,मालोंडे-वसई गाव, ता. वसई, जि.पालघर, पिन४०१२०१
दुरध्वनी क्र.(०२५०)२३२२००७

क्र.मशा/कक्ष-१/फौजदारी/कावि ३१२/२०२४ दिनांकः /०७/२०२४

**जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक ३१२/२०२४
श्री.धनसुखलाल छोटेलाल सुरती ........................अर्जदार

विरुध्द

सहा. आयुक्त,
वसई विरार शहर महापालीका
ता. वसई जि. पालघर ......................सामनेवाले

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी त्यांची पत्नी **कै.शशिकला धनसुख सुरती** यांचा मृत्यू **दि. ०६/०२/२०१९** रोजी माणिकपूर ता. वसई येथे झाला असून, त्याची मृत्यूची नोंद करण्याबाबत आदेश मिळण्याकरीता या कार्यालयात अर्ज क्रमांक ३१२/२०२४ दाखल केलेला आहे. या कोणी इसमास हरकत असेल त्यांनी या कार्यालयात हि नोटीस प्रसिध्दझाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी हरकत करावी. सदरहू आदेश देण्याबाबत जर कोणत्याही इसमाची हरकत दाखल नझाल्यास योग्य ते पुरावे व कागदपत्र घेवून अर्जदार हयांना त्यांच्या मृत्यची नोंद करण्याबाबत आदेश देण्यांत येईल हयांची कृपया नोंद घेण्यांत यावी.

आज दि. ३०/०७ /२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व शिक्यानिशी दिला.

**सही/-**
**तहसिलदार वसई करिता**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 58**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ५८**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## ऑफलाईन रेशन वाटप न झाल्यास मनसेचा आंदोलनाचा ईशारा

**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सरचिटणीस नयन कदम यांच्या मार्गदर्शनातून बोरिवली, कांदिवली, चारकोप, मागाठाणे, दहिसर परिसरातील नागरिकांनी शिधावाटप दुकानावर ऑनलाईन यंत्रणा सदोष असल्यामुळे गेले एक ते दिड महिन्यापासून शिधा पत्रिका धारकांना रेशन मिळत .हेमंतकुमार कांबळे, विभाग- अध्यक्ष.कुणाल माईणकर, दिनेश साळवी,अवधूत चव्हाण तसेच महिला पदाधिकारी, उपविभाग अध्यक्ष, शाखा अध्यक्ष यांच्यासह धडक दिली असता सहाय्यक शिधा फ्लीपकार्ड अधिकारी दिपक वावरे यांना नसल्याचा जाब विचारल्यावर त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील ऑनलाईन यंत्रणा सदोष असल्यामुळे रेशन वाटप करण्यास अडचण येत असल्याचे सांगितले. १२ऑगस्ट २०२४ रोजी ऑफ लाईन पद्धतीने रेशन वाटप करण्याचे शासन आदेश दिल्याचे सांगितले. परंतु या आदेशाची अंमलबजावणी त्वरित न झाल्यास शिधा नियंत्रक कार्यालयाला टाळे ठोकण्याचा ईशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.



# मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या तलावांमध्ये 93 टक्के पाणीसाठा

### पाणी पुरवठ्याबाबत तक्रारींचा निपटारा त्वरित करा - आयुक्त


प्रतिनिधी
■ मुंबई

यंदा चांगला पाऊस झाला असून मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांमध्ये आजमितीला ९३ टक्के पाणीसाठा आहे. मुंबईकरांना अखंड, शुद्ध आणि पुरेशा दाबाने महानगरपालिका पाणी पुरवठा करीत असते.

सध्या काही निवडक ठिकाणांहून पाणी पुरवठयाबाबतच्या तक्रारी येत आहेत. लोकप्रतिनिधींनी पाणीपुरवठ्याबाबत केलेल्या तक्रारींचे त्वरित निराकरण करावे, पाणीविषयक सर्वच तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन त्यांचा निपटारा योग्य वेळेतच करावा, असे सूपष्ट निर्देश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत.

जलवाहिन्यांवरील गळती तातडीने शोधून काढावी, गळती शोधून काढण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी अतिरिक्त मनुष्यबळाचा वापर करावा, विविध पाळ्यांमध्ये कर्मचारी नियुक्त करावेत, पाणी गळती सापडल्यानंतर ती विनाविलंब दूर करावी, असे निर्देशदेखील महानगरपालिका आयुक्तांनी दिले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडक कार्यक्षेत्रामध्ये पाणी गळती, पाणी कमतरता याबाबतच्या तक्रारी येत आहेत. या पार्श्वभूमीवर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी बैठक घेत जल अभियंता विभागाने करावयाच्या अपेक्षित कार्यवाही बाबत निर्देश दिले. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त



(प्रकल्प) अभिजीत बांगर, जल अभियंता पुरूषोत्तम माळवदे यांच्यासह संबंधित अधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

भांडूप संकूल व पिसे पांजरापूर संकूल जलप्रक्रिया केंद्रातील पाण्याची पातळी योग्य राखण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तथापि, संभाव्य गळती, पाण्याचा उपसा वाढणे आणि बेकायदेशीर मोटर पंपांचा वापर यासोबतच दूषित पाणीपुरवठ्याचा स्रोत शोधला पाहिजे, या गोष्टींवर देखरेख ठेवणे गरजेचे आहे. पाण्याचा उपसा जेवढा सुनिश्चित केला आहे, तेवढाचा केला पाहिजे. पाण्याचा अतिरिक्त उपसा होणार नाही, याची दक्षता बाळगली पाहिजे. त्याचबरोबर 'व्हॉल्व्ह ऑपरेशन' वर संपूर्ण नियंत्रण ठेवून पाणीवाटप कोट्यानुसार संपूर्ण कार्यक्षेत्राला होतो की नाही यावरदेखील देखरेख ठेवली पाहिजे. बेकायदेशीर मोटार पंप, अनधिकृत नळजोडण्या यांना आळा बसावा म्हणून पथके गठीत करणे, असे अनधिकृत प्रकार आढळल्यास मोटारपंप जप्त करावेत, तसेच दंडात्मक कारवाई करावी. असेही निर्देश आयुक्तांनी संबधित अधिकाऱ्यांना दिले.

एफ दक्षिण विभागातील टी. जे. मार्ग, गाडी अड्डा, क्रीसेंट बे, जेरबाई वाडिया रस्ता, गं. द. आंबेकर मार्ग, भोईवाडा स्मशानभूमी, एफ उत्तर विभागातील जोगळेकर वाडी, जी दक्षिण विभागातील सेंच्युरी मिल म्हाडा कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, ना. म. जोशी मार्ग, डिलाईल रोड याचबरोबर वांद्रे (पूर्व) येथील खारदांडा, आप्पा पाडा, क्रांती नगर, मालाड दिंडोशी, बोरिवली येथील राजेंद्र नगर आदी क्षेत्रात कमी दाबाने पाणी येत असल्याच्या तक्रारींचा यावेळी क्षेत्रनिहाय आढावा घेण्यात आला. तसेच दुय्यम अभियंता, सहायक अभियंत्यांना विचारणा करत तक्रारींचा जलद गतीने आणि अधिक कार्यक्षम पद्धतीने निपटारा करावा, याबाबत निर्देश देण्यात आले.

# चांदिवलीत विशाल तिरंगा गौरव यात्रा संपन्न

### महविकास आघाडीतील नेते झाले होते सहभागी

प्रतिनिधी
■ मुंबई

भारताच्या 78 व्या स्वातंत्र्यदिनी चांदिवली विधानसभा क्षेत्रा मध्ये काँग्रेस तर्फे मुंबई न्याय यात्रा कार्यक्रमांतर्गत तिरंगा गौरव यात्रा काढण्यात आली. या यात्रेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे युवा नेते आदित्य ठाकरे, मुंबई प्रदेश अध्यक्षा वर्षा गायकवाड, खासदार संजय राऊत, राष्ट्रपिता महात्मा गांधी चे पणतू तुषार गांधी, खासदार चंद्रकांत हंडोरे, आमदार भाई जगताप, माजी मंत्री सुरेश शेट्टी, माजी मंत्री नसीम खान यांच्यासह चरणसिंग सप्रा व महाविकास आघाडीतील जेष्ठ नेते सहभागी झाले होते.

बैल बाजार बीट चौकी पासून सुरू झालेली ही यात्रा काजूपाडा पाईपलाईन मार्गे 90 फूट रोड



पासून पॅनुनसुला हॉटेल ते अंधेरी घाटकोपर लिंक रोड असल्फा मेट्रो करत परेरावाडी पाईपलाईन मार्गे खैरणी रोड नहार अमृत शक्ती मार्गे डी मार्ट समोरून म्हाडा वसाहत करीत लोक मिलन मार्गे संघर्ष नगर चांदिवली येथे समाप्त झाली.

या यात्रेत छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिकृती, स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या महापुरुषांची प्रतिकृती, तसेच आपल्याला संरक्षण देणारे वायुसेना, जलसेना, थलसेना तसेच मुंबई पोलीसांची प्रतिकृती, तसेच स्वातंत्र्यपूर्वी वापरण्यात येणाऱ्या विंटेज आणि लहान मुलांना आकर्षित करणारे कार्टून कलाकार असा नजरेला दिपवणारा देखावा ही होता यात्रेत 8 ते 10 हजार स्थानिक लोकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# वक्फ बोर्डाचे समर्थन करुन उध्दव ठाकरेंकडून बाळासाहेबांच्या विचारांचा अपमान - खा. नरेश म्हस्के

■ मुंबई

वक्फ बोर्डाला बरखास्त करायला हवे, जिथे जमीन लाटण्याचे काम सुरु आहे अशा ठिकाणच्या जमिनी ताब्यात घ्यायला पाहिजेत, अशी जाहीर भूमिका शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी घेतली होती. परंतु त्यांचा वारसा सांगणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी वक्फ बोर्डाचे समर्थन करुन बाळासाहेबांच्या विचारांचा अपमान केला आहे. गोरगरिब मुस्लिमांना न्याय देण्यासाठी वक्फ बोर्डामध्ये सुधारणा करण्याचे विधेयक संसदेत आणण्यात आले आहे. परंतु केवळ मुल्ला मौलवींना खूश करण्यासाठी लोकसभा निवडणुकीत जे काही मतदान केले आणि आता ते आपल्या विरोधात जाईल, या भीतीने उबाठाने अशा प्रकारची भूमिका घेतली आहे. अशी प्रतिक्रिया शिवसेना खासदार म्हस्के यांनी व्यक्त केली आहे.

वक्फ बोर्ड सुधारणा कायदा मंजूर होऊ देणार नाही, अशी घोषणा करणारे जनाब उद्धव ठाकरे हे केवळ खुर्चीसाठी राजकारण करत आहे. लोकसभेत फेक नरेटिव्हने मिळवलेली मुस्लिम मते येत्या निवडणुकीत कायम राखण्यासाठी उद्धव ठाकरे वक्फ बोर्डाचे समर्थन करत असून त्यांच्या या भूमिकेने स्वर्गीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आत्म्याला वेदना झाल्या असतील, असे ते म्हणाले. महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री कोण हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यात काँग्रेस उबाठांच्या नावाला पाठिंबा देत नाही, मग अशा भूमिकेमुळे काँग्रेस त्यांच्या नावाला पाठिंबा देईल, या स्वार्थी उद्देशाने उद्धव ठाकरे यांनी आज भूमिका घेतल्याचे खासदार म्हस्के म्हणाले.

# घरोघरी तिरंगा अभियानांतर्गत फडकवलेले राष्ट्रध्वज सन्मानपूर्वक जपून ठेवा

### पालिका प्रशासनाकडून मुंबईकरांना आवाहन

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगरात 'घरोघरी तिरंगा' अभियान अंतर्गत मुंबईकरांनी आपल्या घरांवर राष्ट्रध्वज तिरंगा फडकवून स्वातंत्र्य दिवस अधिक संस्मरणीय केला. अभियानाला भरभरून प्रतिसाद दिल्याबद्दल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी मुंबईकरांचे आभार मानले आहेत. अभियान कालावधी संपला आहे, तथापि, नागरिकांनी संस्मरणीय आठवण म्हणून राष्ट्रध्वज तिरंगा सन्मानपूर्वक जपून ठेवावा, असे विनम्र आवाहनही महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने शासनाच्या निर्देशानुसार, १३ ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत देशभरात 'घरोघरी तिरंगा' (हर घर तिरंगा) अभियान राबविण्यात आले. त्यासाठी दिनांक ९ ते १५ ऑगस्ट या कालावधीत निरनिराळे उपक्रम राबवण्यात आले. या अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांच्या निर्देशानुसार आणि अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण मुंबई महानगरात तिरंगा यात्रा, तिरंगा रॅली, तिरंगा शपथ, तिरंगा मेळा, मानवंदना असे भरगच्च उपक्रम संपन्न झाले.

सर्व मुंबईकरांनी १३ ते १५ ऑगस्ट कालावधीदरम्यान घरोघरी राष्ट्रध्वज तिरंगा फडकवण्याचे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले होते. नागरिकांच्या सोयीसाठी टपाल कार्यालये, विभाग कार्यालय (वॉर्ड) यांच्या माध्यमातून राष्ट्रध्वज तिरंगा उपलब्ध करुन देण्यात आले होते. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मंडईमध्ये आणि विभाग कार्यालयांच्या परिसरात 'तिरंगा मेळा'चे आयोजन करुन त्यातील केंद्रांमध्ये देखील राष्ट्रध्वज तिरंगा उपलब्ध करण्यात आले होते.

महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आलेल्या आवाहनाला अत्यंत उत्तम प्रतिसाद देत मुंबईकर नागरिकांनी आपल्या घरी, चाळीत, वसाहतीत, सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये तसेच शैक्षणिक संस्था, कार्यालये आणि आस्थापना आदी ठिकाणी राष्ट्रध्वज तिरंगा फडकवला. या उत्स्फूर्त प्रतिसादासाठी महानगरपालिका प्रशासनाने मुंबईकरांचे आभार मानले आहेत.

'घरोघरी तिरंगा' अभियान आता संपन्न झाले आहे. सर्व मुंबईकरांनी घरोघरी लावलेले तिरंगा ध्वज सन्मानपूर्वक काढून घ्यावे. संस्मरणीय आठवण म्हणून हे राष्ट्रध्वज आपल्याकडे सन्मानपूर्वक आणि सुयोग्य स्थितीत जपून ठेवावे, असे विनम्र आवाहन महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.



*मुंबई : माहीम येथील ॲड. विठ्ठल देसाई मैदान क्रीडांगणात, स्वातंत्र्य जपण्यासाठी, स्वातंत्र्य लढ्यात बालपणी सहभागी झालेले व त्याच विचाराने देशाला वाहून घेतलेले मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष व ज्येष्ठ कामगार नेते, माहीम येथील ९४ वर्षाचे रहिवाशी ॲड. एस. के. शेट्ये यांच्या हस्ते भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनाचे झेंडावंदन केले. याप्रसंगी युनियनचे उपाध्यक्ष डॉ. यतीन पटेल, पर्यावरण अभ्यासक ॲड. गिरीश राऊत, प्रणाली राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.*

# भारतीय कामगार कर्मचारी महासंघातर्फे विद्युत महामंडळाच्या कंत्राटी कामगारांना मोठा दिलासा!

### प्रत्येक कामगाराला १६ लाख रुपयांचा लाभ

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतीय कामगार कर्मचारी महासंघातर्फे महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या वर्षानुवर्षे काम करणाऱ्या रायगड मधील रोहा व गोरेगाव युनिट कंत्राटी कामगारांना मोठा दिलासा मिळालेला आहे. कायम कामगारांप्रमाणेच समान वेतन व समान काम मिळविण्यासाठी इ.स. २०२० मध्ये भारतीय कामगार कर्मचारी महासंघातर्फे ठाणे औद्योगिक न्यायालयात दावा क्र. १६/२० आणि १२/२०१८ दाखल केला. ठाणे औद्योगिक न्यायालयाचे न्यायमूर्ती सोनभद्रे यांनी १८ जुलै २०२४ मध्ये आदेश पारीत करुन महामंडाळाच्या



गोरेगाव- रोहा युनिट कामगारांना दिलासा दिलेला आहे.

कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांना कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांप्रमाणे समान वेतन देण्यात यावे व पगारातील तफावत इ.स. २०१६ पासून ते आजतागायत दयावी असा आदेश दिला. थकबाकीची रक्कम रोहा आणि गोरेगाव युनिटमधील प्रत्येककामगाराला साधारणपणे १६ लाख रुपये मिळतील. भारतीय कामगार कर्मचारी महासंघाने कामगारांसाठी दिलेला हा ऐतिहासिक लढा महासंघाचे सरचिटणीस आमदार भाई जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली कायदेतज्ञ के. टी. विश्वनाथन आणि सचिव प्रकाश शिंदे यांनी स्वतः औद्योगिक न्यायालय येथे मांडला. कंत्राटी कामगारांसाठी हा ऐतिहासिक निर्णय असल्याने या आदेशानुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्युत कंत्राटी कामगारांना त्याचा लाभ मिळू शकतो.

# पालिकेत लिपिक संवर्गाची 2260 पदे रिक्त; आयुक्तांनी आपले अधिकार वापरुन पदे भरावी

### दि म्युनिसिपल युनियनची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवर लिपिक संवर्गाची एकूण ५५६० पदे असून त्यातील फक्त ३३०० पदे कार्यरत आहेत, म्हणजेच एकूण कर्मचाऱ्यांपैकी फक्त ५९% पदे कार्यरत असून, २२६० पदे रिक्त ठेवण्यात आलेली आहेत, म्हणजेच एकूण पदांच्या तुलनेत ४१% टक्के पदे रिक्त ठेवण्यात आलेली आहेत. सदर पदे रिक्त ठेवण्यात आल्यामुळे सद्या कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत आहे. एवढेच नव्हे तर कर्मचाऱ्यांचे आस्थापनाविषयक प्रश्न तसेच सेवानिवृत्ती

कर्मचाऱ्यांचे देय्य दावे निकाली काढण्यास त्याचप्रमाणे नागरीसेवा देण्यास खूपच विलंब होत आहे. पर्यायाने संबंधितांच्या रोषाला आस्थापना विभागातील कर्मचाऱ्यांना बळी पडावे लागत असून, सदर कर्मचारी मानसिक तणावाखाली कर्तव्य पार पाडत आहेत.

पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास, निवडीचे निकष शिथिल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना राहतील, असे नमूद करण्यात आलेले आहे. या पार्श्वभूमीवर दी म्युनिसिपल युनियनने "महापालिका आयुक्तांनी परिपत्रक क्र. एमपीआर/२३८४, दि.२४.५.२०२३, परिच्छेद क्र. (१२) ११ नुसार असलेल्या अधिकारांचा अवलंब करून निवडीचे निकष शिथिल करावेत, २. परिपत्रक क्र. एमपीआर/२३८४, दि.२४.५.२०२३, परिच्छेद क्र. (५) (अ) नुसार उत्तीर्णतेसाठी एकूण ४५% गुण आवश्यक ठरविण्यात आले आहेत,

## पवईतून मगरीची सुटका

**मुंबई:** पवई येथील मोरारजी नगर परिसरातील साकी विहार रस्त्याजवळील ५ फूट खोल खड्ड्यात आढळलेल्या सुमारे पाच फुटी मगरीची गुरुवारी रात्री सुटका करण्यात आली. 'रॉ'(रेस्क्यूइंक असोसिएशन फॉर वाईल्डलाईफ वेल्फेअर) या प्राणी संघटनेचे कार्यकर्ते आणि वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी 'मार्श' प्रजातीच्या ४.६ फुटांच्या नर मगरीची सुटका केली. साकी विहार रस्त्याजवळील खड्ड्यामध्ये मगर असल्याची माहिती स्थानिक रहिवाशांकडून रॉ संघटनेला मिळाली. संपूर्ण खड्ड्यावर जाळी आच्छातून मगरीला पकडण्याचा प्रयत्न करण्यात आला. मगर जाळ्यात येईपर्यंत प्रतीक्षा करावी लागली. अखेर रात्री १०.३० च्या सुमारास मगर जाळ्यात सापडल्यानंतर मगरीला पुन्हा नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

# वेतन आयोगाच्या शिफारशींसाठी कृषी महामंडळाचे कर्मचारी आंदोलनाच्या पवित्र्यात

प्रतिनिधी
■ मुंबई

एका बाजूला लाडकी बहिण सारख्या योजनांच्या माध्यमातून राज्य सरकारची पैशाची उधळपट्टी सुरू असताना, दुसरीकडे नफ्यात असूनही व स्वबळावर आर्थिक तरतूद करूनही महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळातील कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीतील फरकाची रक्कम देण्यास टाळाटाळ केली जात आहे. परिणामी २१ ऑगस्ट रोजी महामंडळाचे कर्मचारी सामूहिक रजेवर जात असून २९ ऑगस्ट रोजी सर्व कर्मचारी व्यवस्थापकीय संचालकांच्या दालनासमोर धरणे धरणार आहेत.

राज्य सरकारचे उपक्रम असलेली अनेक महामंडळ आहेत. त्यात कायम नफ्यात राहिलेल्या महामंडळामध्ये राज्य कृषी उद्योग विकास महामंडळाचा समावेश होतो. परंतु, असे असूनही महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीमधील फरकाची रक्कम देण्यात आलेली नाही. राज्य सरकारने २०१६ मध्येच या वेतन आयोगच्या शिफारसी लागू केला होत्या. मात्र सरकारी उपक्रम असलेल्या कृषी उद्योग विकास व अन्य महामंडळांमध्ये १ जुलै २०२१ पासून या शिफारसी लागू करण्यात आल्या. त्यामुळे २०१६ ते २०२१ या काळातील फरकाची रक्कम मिळावी, अशी मागणी महाराष्ट्र कृषी उद्योग कर्मचारी संघाने वेळोवेळी केली आहे.

वास्तवात आतापर्यंत चौथ्या, पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसी सरकारी कर्मचाऱ्यांसोबतच विविध महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आल्या होत्या. सातव्या आयोगाच्या शिफारशी मात्र साडेपाच वर्षे विलंबाने लागू करण्यात आल्या. त्यामुळे फरकाच्या रकमेचा प्रश्न निर्माण झाला आहे. आश्चर्याची बाब म्हणजे सिडको व औद्योगिक विकास महामंडळ यांच्या व्यवस्थापनाने राज्य सरकारच्या परवानगीची वाट न पाहता आपापल्या कर्मचाऱ्यांना २०१६ पासूनच शिफारशी लागू केल्या होत्या. तसेच वन विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना अगदी अलीकडे म्हणजे २९ जुलै रोजी फरकाची रक्कम देण्याचा निर्णय घेण्यात आला. कृषी विकास महामंडळ नफ्यात असून कर्मचारी संघाच्या मागणीनुसार महामंडळाने फरकाची रक्कम देण्यासाठी स्वबळावर २३ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मात्र प्रत्यक्ष निर्णय घेण्यास टाळाटाळ केली जात आहे. याबाबत महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. मंगेश गोंदावले यांच्याकडे विचारणा केली असता ते राज्य सरकार तसेच कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे बोट दाखवतात. परंतू कृषी मंत्री या मागणीबाबत सकारात्मक असून व्यवस्थापनच निर्णय घेण्याचे टाळत आहे, असा कर्मचाऱ्यांचा दावा आहे.

फरकाची रक्कम मिळण्याबरोबरच कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी, राज्य सरकारची आश्वासित प्रगती योजना कर्मचाऱ्यांना लागू करणे, नवीन कर्मचारी भरती, कल्याणकारी सुविधा उपलब्ध करून देणे आदी मागण्यासाठी कर्मचारी २१ ऑगस्ट रोजी सामूहिक रजेवर जाणार असून २९ ऑगस्ट रोजी व्यवस्थापकीय संचालकांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे कर्मचारी संघाचे अध्यक्ष सुभाष पवार यांनी सांगितले.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E.H.V. Civil Const. cum Maint. Division, Airoli**
**SRM e-Tender Notice No. 09/2024-25**

Website: www.mahatransco.in email: ee7710@mahatransco.in
Online bids (SRM-e-Tenders) are invited for following work, from registered agencies.

| Sr. No. | RFx No. | Name of work | Estimated cost in Rs. |
|---|---|---|---|
| 1 | **7000032767** | AMC of Civil Maintenance works of company's assets at SLDC Kalwa Complex, Airoli for FY 2024-25. | 19,29,739.38 |
| 2 | **7000032766** | Civil works for providing and fixing new chainlink fencing to 400/220KV yard towards garden side at Kalwa Complex Airoli. | 24,08,218.54 |

**Schedule**

| | | |
|---|---|---|
| 1 | Start date | From 10:00:00 hours of 15.08.2024 |
| 2 | Submission dead line date | 21.08.2024 upto 23:59:59 hours. |
| 3 | Techno commercial response opening date | 22.08.2024 @ 11:00:00 hours. |
| 4 | Price bid opening date | 22.08.2024 @ 14:00:00 hours. |

Contact person: Miss. Ashwini Pawar, Assistant Engineer (Civil), Tel. No. 022-27601814 (O), Mob. 8793292312. For detailed information, please visit website: https://srmetender.mahatransco.in (Guest User.)

**Executive Engineer (Civil), Airoli.**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E- TENDER 3RD CALL NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors agencies on Mahatransco E-Tendering website https://srmetender.mahatransco.in/ for following works:

| Sr. No. | RFX No. | E-Tender No. & Description of Material | Due date & Time (Hrs.) for submission & Opening of Tender |
|---|---|---|---|
| 1 | 7000031871 | **SE/EHV/O&M/CIR/KLW/TECH/ Ten-27(3rd call)/24-25** E-Tender for AMC for restoration of collapse tower of various 400KV, 220KV & 100/132 KV lines under 400KV & 220KV Lines S/Dns Kalwa under EHV (O&M) Dn.,Kalwa & under EHV Line Maintenance Sub-Division, Boisar under EHV O&M Division, Boisar. | Tender Downloading Dates & time. Tender Sale period. From Dt: **15.08.2024, 00:00 Hrs to Dt. 22.08.2024, 09:59 Hrs** **Technical Opening: - Dt.22.08.2024 at 10: 00 Hrs** (Onwards if possible) **Commercial Opening: - Dt. 22.08.2024 at 15:00 Hrs** (Onwards if possible) |
| | | **Tender Fee** | **Rs. 500 + GST** |
| | | **Estimated Cost** | **Rs. 1,00,00,000/-** |

**Contact Person** Executive Engineer/ Dy. Exe. Engineer (O) Tel No. 9769006245 / 7506379055 **Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

## जैमुनी सहकारी पतपेढी मर्यादित, उमराळे

### वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस

जैमुनी सहकारी पतपेढी मर्यादितच्या सर्व भागधारकांना कळविण्यात येते की, संस्थेची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ०१ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ठिक ९.०० वाजता भाऊसाहेब वर्तक विद्यामंदिर, नाळे येथे संस्थेच्या विद्यमान उपाध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व भागधारक सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय**

१) दिनांक १७ सप्टेंबर २०२३ रोजी संपन्न झालेल्या ३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे व दिनांक ३ मार्च २०२४ रोजी पार पडलेल्या विशेष सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) ३१ मार्च २०२४ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षातील कामकाजा संबधीचा अहवाल ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे.
३) मागील वर्षीय दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
४) आर्थिक वर्ष २०२३ २०२४ च्या वैधानिक लेखापरीक्षकाच्या लेखापरीक्षण अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.
५) कायदा व नियम यास अनुसरुन नफा वाटणीस मान्यता घेणे व लाभांश जाहीर करणे.
६) सन २०२४-२०२५ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे तसेच सन २०२३-२०२४ च्या अंदाजपत्रकातील अंदाजीत खर्चापेक्षा जास्त झालेल्या खर्चाची माहिती देणे आणि मंजुरी घेणे.
७) सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखापरीक्षकांची व अंतर्गत लेखापरीक्षकांची नेमणूक करणे तसेच मेहनताना ठरविणे.
८) सामोपचार योजने अंतर्गत कर्जफेड झालेल्या कर्जखात्याची माहिती देणे.
९) ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१०) माननीय अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.
११) समारोप.

**ठिकाण : उमराळे**
**दिनांक : १६ ऑगस्ट २०२४**

**संचालक मंडळाच्या वतीने**
**अरविंद मधुकर पाटील**
**व्यवस्थापक**

**टिप :** गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल.

**सुचना :**
१) कृपया सभासदांनी येताना अहवालाची प्रत सोबत आणावी. :
२) ज्या सभासदांना संस्थेच्या कामकाजासंबंधी प्रश्न विचारायचे असतील त्यांनी आपले प्रश्न दिनांक २८ ऑगस्ट २०२४ पर्यंत पतसंस्थेच्या प्रधान कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात सादर करावेत. मात्र असे प्रश्न उपविधी दुरुस्ती व सभासदास काढून टाकण्या व्यतिरिक्त असावेत. सभासदांच्या विधायक सूचनांचा संचालक मंडळ अवश्य विचार करेल.
३) दिनांक ०३ सप्टेंबर २०२४ पासून संबंधित शाखांतून लाभांश वाटप केले जाईल तसेच ज्या सभासदांनी आपली बचत खाती उघडली नसतील अशा सभासदांनी आपली बचत खाती उघडावीत जेणेकरुन लाभांश बचत खाती वर्ग करता येईल.
४) संस्थेच्या उपविधीनुसार क्रियाशील सभासदांसाठी वार्षिक सर्वसाधारण सभेची उपस्थिती अनिवार्य आहे.

मी अशा देवावर विश्वास ठेवत नाही जो जिवंत असताना माणसाला अन्न देऊ शकत नाही मात्र मरणानंतर स्वर्ग देतो.



- स्वामी विवेकानंद

वृत्तमानस
मुंबई, शनिवार, १७ ऑगस्ट २०२४

# बनवा बनविची आभासी दुनिया...

सायबर गुन्हेगारांनी नागरिकांची फसवणूक करण्यासाठी डिजिटल अरेस्ट या नावाने नवीन शक्कल लढवली आहे. संबंधित व्यक्तीला कारवाई टाळण्यासाठी पैशाची मागणी करतात. डेबिट कार्डचा पासवर्ड विचारून त्यांचे बँक खाते रिकामे करतात. हल्ली अशा घटना राज्यांत अनेक ठिकाणी घडल्या आहेत. फसवणुकीचा आकडा कोट्यवधींच्या घरात असल्याने ही चिंतेची बाब आहे. महाराष्ट्र पोलिसांनी याबाबत पुढाकार घेऊन डिजिटल अरेस्ट या बनावट प्रकाराबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. याबाबत नागरिकांना माहिती व्हायला हवी. शाळा-महाविद्यालयांमध्ये कार्यशाळा, प्रात्यक्षिके, प्रशिक्षण, जनजागृती कार्यक्रम आणि प्रचार- प्रसार करायला हवा अन्यथा राज्यातील लोक हजारोंच्या संख्येने सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकतील आणि लाखो रुपये गमवतील. अनेकदा घरात नजरकैद असा प्रकार ऐकिवात असतो. यामध्ये पोलिस घरातल्या घरात आरोपींच्या हालचालींवर लक्ष ठेवतात. तसाच काहीतरी डिजिटल अरेस्ट प्रकार असावा, अशी अनेकांची धारणा आहे. मात्र प्रत्यक्षात हा बनवाबनवीचा प्रकार आहे. कायद्यानुसार डिजिटल अरेस्टला कोणतीही मान्यता नाही. पोलिस किंवा कोणतीही सुरक्षा यंत्रणा कुणालाही अशा प्रकारे डिजिटल अरेस्ट करीत नाहीत. सायबर गुन्हेगार नवनवीन युक्ती काढून अनेकांची लुबाडणूक करतात. ती करण्यासाठीच डिजिटल अरेस्ट नावाची युक्ती गुन्हेगार वापरत आहेत. या गुन्हेगारांची टोळी पीडितांना पोलिस, ईडी, सीबीआय, प्राप्तिकर विभाग, लष्करी अधिकारी असल्याची बतावणी करतात. देशविघातक कृत्य, बेकायदेशीर वस्तू, ड्रग्ज, बनावट पासपोर्ट, दहशतवाद्यांशी आर्थिक व्यवहार केल्याचे सांगून डिजिटल अरेस्ट केल्याचे सांगतात. यात पीडित व्यक्तीला २४ तासांपर्यंत त्याच्याच घरात व्हिडीओ कॉलवर बंदिस्त राहायला सांगितले जाते. सायबर गुन्हेगार व्हिडीओ कॉलवर कुठल्या तरी पोलिस स्टेशन किंवा सीबीआयसारख्या एजन्सीच्या कार्यालयातून बोलत असल्याचे भासवतात. त्यामुळे पीडित व्यक्तीचा विश्वास बसतो. पीडित व्यक्ती खरेच तिला डिजिटल अरेस्ट झाल्याचे मानू लागते. यादरम्यान सायबर गुन्हेगार त्यांना खंडणीची मागणी करतो. पैसे न दिल्यास प्रत्यक्षात अटक करण्याची भीती दाखवतो. त्यामुळे अनेक जण सायबर गुन्हेगारांच्या नव्या शक्कलला बळी पडतात आणि लाखो रुपये त्यांच्या घशात घालतात. उच्चशिक्षित तरुण किंवा तरुणी कायदे आणि नियमांबाबत माहिती ठेवून असतात. त्यामुळे सायबर गुन्हेगार डिजिटल अरेस्टची क्लृप्ती शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी किंवा वृद्ध व्यापारी यांच्यावर वापरतात. ज्येष्ठ नागरिकांना तंत्रज्ञान किंवा कायदेशीर तरतुदींबाबत अनेकदा पुरेशी माहिती नसते. त्यामुळे त्यांची फसवणूक करणे सोपे जाते. ही बाब हेरून सायबर गुन्हेगार त्यांना निवडतात. सध्या त्यांच्या रडारवर अशाच प्रकारचे लोक असल्याचे समजते. काही विशिष्ट घटनांमध्ये संशयास्पद पीडितांना डिजिटल अटक करण्यात येते आणि फसवणूक करणाऱ्यांना स्काइप किंवा इतर व्हिडीओ कॉन्फरन्सिंग प्लॅटफॉर्मवर त्यांच्या मागण्या पूर्ण होईपर्यंत ते दृश्यरीत्या उपलब्ध असतात. फसवणूक करणारे पोलिस स्टेशन आणि सरकारी कार्यालयांच्या मॉडेलचे स्टुडिओ वापरतात आणि अस्सल दिसण्यासाठी गणवेश परिधान करतात, असे स्पष्ट झाले आहे. भारतीय सायबर क्राइम को-ऑर्डिनेशन सेंटर, गृह मंत्रालयाच्या अंतर्गत देशातील सायबर गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी संबंधित क्रियाकलापांचे मोठा समन्वय साधतो. या फसवणुकीचा प्रतिकार करण्यासाठी इतर मंत्रालये आणि त्यांच्या एजन्सी, रिझर्व्हसोबत जवळून काम करीत आहे. काही प्रकरणे ओळखण्यासाठी आणि तपास करण्यासाठी राज्य/केंद्रशासित प्रदेशांच्या पोलिस प्राधिकरणांना इनपुट आणि तांत्रिक साहाय्यदेखील प्रदान करीत आहे. अनेकदा मायक्रोसॉफ्टच्या सहकार्याने अशा प्रकारच्या क्रियाकलापांमध्ये गुंतलेले १,००० हून अधिक स्काइप आयडी ब्लॉक केले आहेत. हे अशा फसवणूकदारांद्वारे वापरलेले सिम कार्ड, मोबाइल डिव्हाइस आणि खेचर खाती जपून ठेवण्याचेदेखील सुलभ करते. मुळात यापासून वाचण्याचे प्रकार खूप सोपे आहेत. सायबर गुन्हेगाराचा व्हिडीओ कॉल आल्यानंतर न केलेल्या गुन्ह्यांत अडकण्याची भीती बाळगू नये. सायबर गुन्हेगाराच्या जाळ्यात अडकल्यानंतर डिजिटल अरेस्टबाबत बोलताच फोन बंद करावा. नातेवाईक, वकील किंवा कुटुंबातील सदस्यांना याबाबत माहिती द्यावी. पैशाची मागणी केल्यास पैसे देऊ नये. जवळच्या पोलिस ठाण्यात माहिती द्यावी. फसवणुकीपासून वाचण्यासाठी सायबर क्राइम हेल्पलाइन १९३० वर तक्रार करणे आवश्यक आहे. तसेच नजीकच्या सायबर पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल करणेही महत्त्वाचे असते. अनेकदा भीतीपोटी अनेक गोष्टी अथवा घटना सांगितल्या जात नाहीत. समाजात आपली असलेली पत आणि त्याला बसणारा धोका यामुळे अनेक बाबी दडपल्या जातात. अनेकदा सायबर गुन्हेगार सामान्यतः संभाव्य पीडितांना कॉल करतात आणि सांगतात की, त्यांना बेकायदा वस्तू, ड्रग्ज, बनावट पासपोर्ट आदी अवैध वस्तूंचे कुरिअर पाठविण्यात आले आहे. काही प्रकरणांमध्ये फसवणूककर्ते एखाद्या व्यक्तीच्या नातेवाईक किंवा मित्रांशी संपर्क साधतात आणि त्यांना सांगतात की, तुमचा मित्र, भाऊ किंवा बहीण एखाद्या गुन्ह्यात किंवा अपघातात सामील असल्याचे आढळले आहे आणि ते आमच्या ताब्यात आहेत. लोकांना खरे वाटावे यासाठी पोलिसांच्या छायाचित्रांचा आणि ओळखपत्रांचादेखील वापर केला जातो. त्यानंतर खटला बंद करण्यासाठी नातेवाईक किंवा पीडितांकडून पैशांची मागणी केली जाते. काही प्रकरणांमध्ये पीडितांना स्काइप कॉलवरदेखील जोडले जाते. त्यासाठी सायबर गुन्हेगार पोलिस स्थानक किंवा सरकारी कार्यालयांसारखे दिसणारे स्टुडिओ तयार करतात आणि पोलिसांचे गणवेश घालून असतात. जोपर्यंत त्यांना पैसे पाठवले जात नाहीत तोपर्यंत ते तुम्हाला कॉलच्या बाहेर पडण्याची परवानगी देत नाहीत. यात कायद्याचा धाक दाखवून तुम्हाला अडकवून ठेवले जाते. नॅशनल सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टलवर पोलिस अधिकारी, केंद्रीय अन्वेषण ब्यूरो, नार्कोटिक्स विभाग, सक्तवसुली संचालनालय, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्याकडे सायबर गुन्हेगारांद्वारे धमकावणे, ब्लॅकमेल, खंडणी आणि डिजिटल अरेस्ट केल्याच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी करण्यात आल्या आहेत. देशभरातील पीडितांनी यामध्ये मोठ्या प्रमाणात पैसे गमावल्याची नोंद करण्यात आली आहे. गुप्तचर संस्थांनी असा निष्कर्ष काढला आहे की, या घटना सीमापार गुन्हेगारी सिंडिकेटद्वारे चालवल्या जात आहेत. हे एका ऑनलाइन गुन्हेगारी रॅकेटचे काम आहे. गृह मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या भारतीय सायबर क्राइम को-ऑर्डिनेशन सेंटरने मायक्रोसॉफ्टच्या सहकार्याने अशा हजाराहून अधिक स्काइप आयडी ब्लॉक केल्या आहेत. भारतीय सायबर क्राइम को-ऑर्डिनेशन सेंटर आता अशा अवैध सिम कार्ड, मोबाइल डिव्हाइसेस आणि खोट्या वेबसाइट्सचा शोध घेत आहेत. यावरदेखील लवकरच बंदी आणली जाणार आहे. या गुन्हेगारी कारवायांचा मुकाबला करण्यासाठी गृह मंत्रालय, इतर मंत्रालये आणि त्यांच्या यंत्रणा, आरबीआय व इतर संस्था मिळून काम करीत आहेत. सायबर क्राइम को- ऑर्डिनेशन सेंटर फसवणुकीची प्रकरणे ओळखण्यासाठी आणि तपासासाठी राज्ये, केंद्रशासित प्रदेशांच्या पोलिस दलांना तांत्रिक साहाय्य पुरवत सायबर क्राइम को-ऑर्डिनेशन सेटरन त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया प्लॅटफॉर्म सायबरदोस्तवर जागरूकता वाढवण्यासाठी इन्फोग्राफिक्स आणि व्हिडीओ पोस्ट केले आहेत. मंत्रालयाने नागरिकांना सावध राहण्याचा आणि सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती करण्याचा सल्ला दिला असून त्याचे पालन सर्वांनी वेळेत केले तर पुढील धोका टळू शकतो.

# रक्षाबंधनाचा उद्देश तेव्हाच साध्य होईल...

हिंदू संस्कृतीत भाऊ-बहिणीचे नाते हे अत्यंत पवित्र मानले जाते. रक्षाबंधनाच्या दिवशी बहीण भावाच्या मनगटाला राखी बांधून त्याच्याकडून तिच्या रक्षणाचे वचन घेते. भाऊसुद्धा 'प्राणपणाने तुझे रक्षण करेल', असे बहिणीला वचन देतो. या दिवशी बहीण आपल्या भावाच्या उत्तम आरोग्यासाठी आणि समृद्धीसाठी देवाकडे प्रार्थना करते तर भाऊसुद्धा बहिणीच्या दीर्घायुष्यासाठी, सुखसंपन्नेतेसाठी आणि संरक्षणासाठी देवाकडे याचना करतो. सहस्रो वर्षांची परंपरा लाभलेल्या या सणाला भाऊ बहिणीतील अतुल प्रेमाची, आदराची आणि निष्ठेची जोड आहे. द्वापारयुगात एकदा भगवान श्रीकृष्णाच्या मनगटाला जखम होऊन त्यातून रक्त वाहू लागले, हे पाहताच द्रौपदीने क्षणाचाही विलंब न करता नेसलेल्या भरजरी वस्त्राच्या टोकाचा एक तुकडा फाडून श्रीकृष्णाच्या मनगटाला बांधला. तेव्हापासून बहीण भावाच्या पवित्र नात्याचा हा उत्सव साजरा केला जाऊ लागला. रक्षाबंधनाच्या दिवशी सूर्योदयी स्नान करतात. उपकर्म करून ऋषींचे तर्पण करतात अपराह्नकाळीं राखी तयार करतात. तांदूळ, सोने आणि पांढऱ्या मोहऱ्या एकत्र करून त्यांची पुरचुंडी तयार केली जाते, जिला राखी म्हटले जाते. या राखीचे पूजन केले जाते . त्यानंतर 'येन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबल: । तेन त्वामपि बध्नामि रक्षे मा चल मा चल ॥' हा मंत्र म्हणून बहीण भावाला ही राखी बांधते. 'महाबली दानवेंद्र बळी राजा जिने बद्ध झाला, त्या रक्षेने मी तुलाही बांधतो. हे रक्षे, तू चलित होऊ नकोस' असा या मंत्राचा अर्थ आहे. कालागणिक हा सण साजरा करण्याची पद्धत जरी बदलली असली, तरी सणामागील उद्देश मात्र तोच आहे. आज आपला भाऊ साता समुद्रापार जरी असला तरी बहीण त्याला राखी पाठवायला विसरत नाही. ज्या बहिणींना सख्खा भाऊ नसतो ती अन्य पुरुषाला किंवा चंद्राला आपला भाऊ मानते आणि हा सण साजरा करते. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:| यात्रेतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफला: क्रिया:|' अर्थात ज्या कुळामध्ये स्त्रीची पूजा, म्हणजेच तिचा मान- सन्मान होतो, त्या कुळात सुशील आणि गुणसंपन्न संतती जन्माला येते. ज्या ठिकाणी स्त्रीचा अपमान होतो त्या कुळाची प्रगती खुंटते हा संस्कार हिंदू धर्मग्रंथांनी केल्यामुळे हिंदू धर्मात स्त्रीला नेहमीच आदराचे आणि सन्मानाचे स्थान दिले गेले आहे. रक्षाबंधन हा सणसुद्धा स्त्रीच्याप्रती आदर व्यक्त करणारच सण आहे. आठशे वर्षांपूर्वी संत ज्ञानेश्वरांनी पसायदानातून विश्वबंधुत्वाची शिकवण दिली आहे.



लहानपणी शाळेतसुद्धा सारे भारतीय माझे बांधव आहेत, अशी प्रतिज्ञा करूनच प्रत्येक जण मोठा झाला आहे. दुर्दैवाने या सर्वांचा आजच्या तरुण वर्गाला विसर पडला आहे. आजमितीला देशासह राज्यातील स्त्रियांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. १ वर्षाच्या बालिकेपासून ८० वर्षांची वृद्धाही नराधमांच्या वासनेतून सुटत नाही. आपल्या बहिणीला रक्षणाचे वचन देणारा भाऊ अन्य स्त्रीमध्ये आपल्या भगिनींचे रूप का पाहू शकत नाही. आपल्या संस्कृतीचा आपल्यालाच विसर पडू लागला आहे का ?

छत्रपती शिवाजी महाराज हे आजच्या पिढीचे दैवत आहेत, आजचा तरुण एकवेळ आईवडिलांचा अपमान सहन करेल; मात्र छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अपशब्द काढणाऱ्याची जीभ छाटल्याशिवाय राहणार नाही. आज मंदिरातील देवांच्या मूर्ती शाबूत आहेत ते छत्रपती शिवाजी महाराजांमुळेच. पाच बलाढ्य पातशाह्यांविरोधात लढून महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. रयतेला भयमुक्त केले. व्यापाराचे निमित्त करून सत्ताकारणात ढवळाढवळ करू पाहणाऱ्या इंग्रजांना त्यांची जागा दाखवून दिली. आपल्या अधिकाराचा गैरवापर करून महिलेवर अत्याचार करणाऱ्या रांझे पाटलाचा चौरंगा करून छत्रपती शिवाजी महाराजांनी एक आदर्श स्वराज्यासमोर निर्माण केला. स्वराज्यातील स्त्रीकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्याची काय स्थिती होऊ शकते याचे उदहारण त्यांनी जगासमोर उभे केले. त्यानंतर कोणाची हिम्मत झाली नाही स्वराज्यातील स्त्रियांकडे वासनेच्या नजरेने पाहण्याची. असा राजा ना कधी झाला ना भविष्यात कधी होणार ! छत्रपती शिवाजी महाराज असे एकमेव राजे आहेत ज्यांची जयंती समस्त महाराष्ट्रासह ज्या ज्या ठिकाणी मराठी माणसे आहेत त्या ठिकाणी वर्षातून दोन वेळा तितक्याच उत्साहाने साजरी केली जाते. छत्रपती शिवाजी महाराजांची एकतरी तसबीर किंवा मूर्ती नाही असे एकही घर महाराष्ट्रात सापडणार नाही. गाड्यांवर, घरा-दारावर, मोबाईलच्या वॉलपेपरवर शिवाजी महाराजांचे चित्र लावण्याची जणू प्रथाच पडली आहे. शिवाजी महाराजांना देव मानणारा आजचा तरुण लुटीच्या मुद्देमालासह आलेल्या कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला सन्मानाने स्वगृही पाठवणाऱ्या शिवाजी महाराजांची वृत्ती अंगी केव्हा बाणवणार आहे ? स्वराज्यातील बाया बापड्यांच्या रक्षणासाठी स्वतःचे प्राण धोक्यात घालणाऱ्या संभाजी महाराजांचा आदर्श आजचा तरुण कधी अंगिकारणार आहे ? जो देश आपल्या इतिहासातून धडे घेत नाही तो देश रसातळाला जातो अशी एक म्हण आहे. आजच्या तरुणांची स्थितीही काहीशी अशीच झाली आहे. आज तरुणांना गरज आहे इतिहासातील थोर पुरुषांच्या चरित्रातून धडे घेऊन आपले चारित्र्य घडवायची. माननीय मुख्यमंत्र्यांनी यापूर्वी सांगितल्याप्रमाणे लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्यातील समस्त बहिणींच्या बँक खात्यात रक्षाबंधनापूर्वीच ३००० रु. जमा करून बहिणींना आश्वस्त तर केले आहे; मात्र बहिणींना केवळ आर्थिक साहाय्य करणे एव्हढेच भावाचे कर्तव्य नसून बहिणीच्या रक्षणाची सर्वस्वी जबादारी घेणे हे भावाचे प्रमुख दायित्व आहे. आजची राज्याची परिस्थिती पाहता राज्यातील भगिनींना आर्थिक मदतीपेक्षा सुरक्षिततेचीच अधिक आवश्यकता आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील महिलेवर अत्याचार करणाऱ्या रांझे पाटलाचे हात पाय कलम करून वासनांधांवर अंकुश निर्माण केला होता. राज्याची आजची स्थिती पाहता आज राज्यातही अशा कठोर कायद्याची नितांत गरज आहे. स्त्री अत्याचाराच्या विरोधात ज्यावेळी कठोर कायदे अमलात येऊन त्यांची प्रामाणिकपणे अंमलबजावणी केली जाईल, ज्या दिवशी स्त्री अत्याचाराचा आलेख घसरू लागेल आणि ज्या दिवशी एका स्त्रीच्या रक्षणासाठी हजारो मनगटे पुढे सरसावतील त्या दिवशी रक्षाबंधनाचा उद्देश खऱ्या अर्थाने साध्य झाला असे म्हणता येईल.

- जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई

# तळकोकणातले 'दिलखुष'

तुम्ही गावागावातली जख्ख म्हातारी,वय झालेली माणसं बघितलीयत? अनुभवाने परिपक्व झालेली,मायाळू,आल्यागेल्याला खाऊनपिऊन जायचा आग्रह करणारी. बघितलीच असतील म्हणा.तर आमच्या देवगडला तसच एक हॉटेल आहे. चक्क 1935 सालापासून आजपर्यंत सतत ग्राहकांच्या सेवेत असलेलं आणि वय वाढलं तरी थकून न जाता उलट नव्या दमाने उभं राहिलेलं.ते आहे श्री. मकरंद ललीत यांचं“ हॉटेल दिलखुष” किंवा “दिलखुष उपहारगृह”.

देवगड हे फार पूर्वीपासून सगळ्यात सुरक्षित बंदर म्हणून प्रसिद्ध आहे. जेव्हा बोटी सुरू होत्या,माणसं बोटीने प्रवास करायची तेव्हा बोटींचा एक महत्वाचा थांबा म्हणजे देवगड बंदर होतं. पायी किंवा जास्तीत जास्त बैलगाडीने प्रवास करायच्या त्या काळात आतासारख्या सगळ्या सोयी उपलब्ध नव्हत्या. परंतु बंदर असल्यामुळे लोकांची वर्दळ असायची. याच काळात कै. हरिभाऊ ललीत यांनी भाड्याच्या जागेत हे “दिलखुष उपहारगृह” सुरू केलं.

उसळपुरी, पोहे,शिरा,वडे ,चहा, याशिवाय शेव ,गाठी,चिवडा,लाडू असे अनेक पदार्थ इथे लोकांना मिळू लागले. यात विशेष प्रसिद्ध झाली ती “ कांदा-खोबरं विरहित चुलीवर केलेली काळ्या वाटण्याची उसळ.” गावोगावची लोक इथे केवळ “ललितांकडची उसळ” खाण्यासाठी येऊ लागली.अनेकांच्या प्रवासातल्या एकवेळच्या निवाऱ्याचंसुद्धा हे त्याकाळचं हक्काचं ठिकाण होतं.

तेव्हापासून सुरू असलेल्या आणि उत्तम चालणाऱ्या या उपहारगृहाला मधल्या काळात बोटी बंद झाल्यानंतर थोडेसे चढउतार बघावे लागले परंतु कॉलेजला जायला लागल्यानंतर श्री.मकरंद ललीत यांनी सकाळच्या वेळेत कॉलेज करून संध्याकाळच्या वेळेत हॉटेल मध्ये मदतीला यायला सुरुवात केली. सुमारे 25 वर्षांपूर्वी bsc chemistry ला first class मिळूनही नोकरीच्या मागे शहरात न जाता आपण हा आपला परंपरागत व्यवसायच करायचा निर्णय त्यांनी घेतला आणि पुन्हा व्यवसायवृद्धीसाठी प्रयत्न सुरू केले. आणि याच प्रयत्नाची परिणती पुन्हा एकदा ग्राहकांच्या वाढत्या प्रतिसादात दिसायला लागली.

2004 साली विवाहानंतर पत्नी सौ.अस्मिताचीही सक्षम साथ त्यांना मिळाली आणि सुरू झाला व्यवसाय वाढीचा विचार. पूर्वीच्या जुन्या भाड्याच्या जागेत एवढी वर्ष सुरू असलेला हा व्यवसाय नव्या उमेदीने आणि नव्या रुपात त्याच जुन्या जागेच्या जवळ असलेल्या नव्या-कोऱ्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीत अधिक प्रशस्त रुपात ग्राहकांच्या सेवेला आणला गेला.सोयीच्या दृष्टीने काही नवीन उपयुक्त मशिन्स आणि उपकरणं यांच्या मदतीने नव्याने सेवा सुरू झाली.वर्ष होतं 2011.

कालानुरूप देवगडच्या खालच्या बाजारपेठेतली बरीचशी दुकान वर st स्टँड च्या आसपास स्थलांतरित झाली. माणसांची खालच्या बाजारपेठेतली वर्दळ कमी झाली.तिथली अनेक दुकान बंद झाली परंतु “ हॉटेलदिलखुष” मात्र नव्या जोमाने उभं राहिलं आणि अजूनही त्याच जोमाने सेवा देत आहे. बाकी बरीचशी दुकान बंद झाली तरी मकरंद ललीत म्हणतात की आमच्या हॉटेलला येणाऱ्या ग्राहकांच्या संख्येत मात्र वाढ झाली आहे.

बटाटावडा, पुरी,बटाट्याची सुकी भाजी, भजी, पोहे,शिरा,चहा-कॉफी, कटवडा आणि यासोबतच गेली 89 वर्ष सुप्रसिद्ध असलेली काळ्या वाटण्याची काळी उसळ असे मोजकेच पदार्थ इथे उपलब्ध असले तरीही ते उत्तम चवीचेच असतात. गेली अनेक वर्ष सतत पुन्हा पुन्हा येणारे अनेक ग्राहक इथल्या आजवर न बदललेल्या उसळीच्या चवीबद्दल सांगतात. जुन्या काळात इथे राहिलेली अनेक लोक कितीही वर्षांनी देवगडला परत आली तरी पहिल्यांदा त्यांचे पाय वळतात ते “ ललीतांकडची काळ्या वाटण्याची काळी उसळ” खायलाच.

या सातत्यपूर्ण सेवेमुळेच जुन्या ग्राहकांबरोबरच अगदी आत्ताचे कॉलेजचे अनेक विद्यार्थिसुद्धा इथले नियमित ग्राहक आहेत. रोज सकाळी पावणेचारला सुरू झालेला मकरंद आणि अस्मिताचा दिवस रोज रात्री 11 नंतर सम्पतो यातच या व्यवसायाचं यश कळून येतं. त्या दोघांच्या अमाप कष्टामुळे देवगडची ही अजून एक विशेष ओळख टिकून आहे आणि आमच्यासारख्या अनेक ग्राहकांना चविष्ट पदार्थांचा आस्वाद घेता येतोय.


तुम्हालाही कधी देवगडला यायची संधी मिळाली तर न चुकता “ हॉटेलदिलखुष” ला भेट द्या आणि इथल्या सुप्रसिद्ध “काळ्या वाटाण्याच्या काळ्या उसळीचा “ आणि इतर पदार्थांचा नक्की आस्वाद घ्या त्याशिवाय तुमची देवगड ट्रिप पूर्ण होणार नाही हे नक्की.

**- उत्तरा जोशी,**
देवगड

# लोककवी वामनदादा कर्डक

**महाराष्ट्राचे लोककवी, शाहीर, आंबेडकरी चळवळीचे बुलंद कार्यकर्ते आणि समाज प्रबोधनकार वामन तबाजी कर्डक यांची १५ ऑगस्ट रोजी १०२ वि जयंती होती. त्यांच्या १०२ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारा हा विशेष लेख.**

वामनदादा कर्डक यांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ रोजी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील देशपंडी या छोट्याशा खेड्यात एका गरीब कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव तबाजी तर आईचे नाव सईबाई असे होते. त्यांना एक मोठा भाऊ आणि एक धाकटी बहीण होती. वामनदादा यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना शिक्षण घेता आले नाही. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने उदरनिर्वाहासाठी दादा मिळेल ती कामे करू लागले. जत्रा यात्रांमधून कुस्ती खेळू लागले त्यातून जे पैसे मिळत त्यातून ते घरखर्च चालवू लागले. वयाच्या विसाव्या वर्षी त्यांचे लग्न झाले पण त्यांना कौटुंबिक स्वास्थ्य लाभले नाही. त्यांच्या पत्नीचे अकाली निधन झाले पुढे मुलाचेही निधन झाले. इतके मोठे दुःख उराशी बाळगून त्यांनी मुंबई गाठली. मुंबईत त्यांनी गिरणी कामगार म्हणून काम केले. बीडीडी चाळीत त्यांचे वास्तव्य असे तिथेच त्यांची सैनिक समता दल आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांशी ओळख झाली. समता सैनिक



दलातर्फे डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या सभेचे आयोजन करण्यात त्यांचा पुढाकार असायचा. वामनदादांना लहानपणापासून गायनाची आवड होती. त्यांना मिळालेली प्रतिभा ही जन्मदत्त देणगी होती. लहानपणापासून गायनाची आवड असलेल्या वामनदादांकडे लेखणी, वाणी आणि संगीत यांचा त्रिवेणी संगम होता. एक दिवस फावल्या वेळेत ते राणीच्या बागेत बसले असताना त्यांनी एका हिंदी चित्रपट गीताचे विडंबन केले. ते गीत त्यांनी राणीच्या बागेतील गर्दीपुढे म्हटले. त्यांचे हे विडंबन गीत उपस्थित लोकांना खूप आवडले. त्यांचा आवाज आणि गाण्याचे बोल लोकांना आवडू लागले. पुढे ते आंबेडकरी जलशांमध्ये गाऊ लागले. विशेषतः ज्या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण असे त्याठिकाणी बाबासाहेबांच्या भाषणाआधी वामनदादांचे गाणे होत असे. बाबासाहेबांनी त्यांच्या गाण्याची स्तुती अनेकवेळा आपल्या भाषणांमधून केली आहे. बाबासाहेब म्हणत माझ्या दहा भाषणांचं काम शाहिरांचं एक गाणे करते. वामनदादांचे बहुतांश गीते हे लोकगीते आहेत. वामनदादांची गीते म्हणजे कोंडलेल्या मनाचा हुंकार. वामन दादांच्या गीतांचा केंद्रबिंदू हा मानव होता म्हणूनच वामनदादा म्हणतात मानवा इथे मी तुझे गीत गावे.... तुझे गीत व्हावे मानवता. आंबेडकर भक्ती, दलित, शोषित, स्त्रीमुक्ती, जातीव्यवस्था यावर वामन दादांनी आपल्या गीतातून प्रबोधन केले. दादांनी आपल्या गीतातून हुंडाबळी, ऊसतोड कामगार, पर्यावरण, कामगार, शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळ यावरही भाष्य केले. त्यांच्या गीतांचे प्रेरणास्थान डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच होते. वामन दादांनी स्वतःला भीमकार्यात वाहून घेतले. दादांनी आपल्या असंख्य लोकगीतांतून लोकांना भुरळ घातली. म्हणूनच ते लोककवी झाले. दादांनी आयुष्यभर आंबेडकरी विचारांची पताका आपल्या खांद्यावर खंबीरपणे वाहिली. आपल्या तेजस्वी लेखणीने आणि कणखर वाणीने फुले, शाहू, आंबेडकर घराघरांत पोहचवणाऱ्या या महाकवीचे १५ मे २००४ रोजी निधन झाले. लोककवी वामन दादा कर्डक यांना १०२ जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार,
पुणे

## पत्र मानस

### अमेरिकेने व्हिसा फेटाळणे चुकीचे

भारतातील आणि जगातील फेमस शिल्पकार अरुण योगीराज यांचा व्हिसा अमेरिकेने नुकताच फेटाळला आहे. विशेष म्हणजे कर्नाटकातील म्हैसूर येथील शिल्पकार अरुण योगीराज याचा व्हिसा अर्ज फेटाळताना अमेरिकेने कोणतेही कारणे दिलेली नाही. अयोध्येच्या राममंदिरातील रामलल्लांची मुर्ती याच अरुण योगीराज शिल्पकारानी घडवली आहे. कन्नड कूटस असोसिएशन तर्फे आयोजित विश्व कन्नड परिषदेला सह कुटुंब उपस्थित राहण्यासाठी योगीराज अमेरिकेत जाणार होते. मागील दहा वर्षात अमेरिका सोबत भारताचे चांगले संबंध प्रस्थापित झाले आहेत असे असतानाही अमेरिकेने भारतीय प्रसिध्द शिल्पकार अरुण योगीराज यांचा व्हिसा फेटाळून चुक केली आहे असे नक्कीच वाटत आहे.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

## कार्यक्रमासाठी वर्दळीच्या ठिकाणी मंडप बांधल्याने नागरिकांमध्ये नाराजी

**कल्याण :** रक्षाबंधन आणि मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या कार्यक्रमासाठी शिवसेनेचे कल्याण पश्चिमेचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी सर्वाधिक वर्दळीच्या शिवाजी चौकात मंडप उभारून सोमवारी कार्यक्रम करण्याचे निश्चित केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शिवाजी चौक वाहन कोंडीने कार्यक्रम नसताना दररोज गजबजलेला असतो. अशा परिस्थितीत या चौकात सोमवारी मंडप उभारून कार्यक्रम ठेवला तर कल्याण शहर वाहन कोंडीने जाम होण्याची भीती प्रवाशांकडून व्यक्त केली जात आहे.आमदार विश्वनाथ भोईर यांना डामडौलात रक्षाबंधन उत्सव आणि लाडकी बहिण योजनेचा कार्यक्रम करायचा असेल तर त्यांनी फडके, सुभाष मैदानात किंवा अत्रे रंगमंदिरात कार्यक्रम घेण्याची मागणी कल्याण मधील नागरिक, विविध क्षेत्रातील व्यावसायिक, दुकानदारांकडून केली जात आहे. यापूर्वी शिवाजी चौकात निवडणूक प्रचाराची कार्यालये थाटली जायची. त्यावेळीही दिवस, रात्र शिवाजी चौक वाहन कोंडीने गजबजलेला असायचा. शिवाजी चौकात मंडप उभारणीसाठी परवानगी देण्याची मागणी करणारे पत्र शिंदे गट शिवसेना आमदार विश्वनाथ भोईर यांनी कल्याणच्या साहाय्यक पोलीस आयुक्तांना पाठविले आहे.



म ह त्त्वा चे

## पैशांनी भरलेली बॅग प्रवाशाला केली परत

**डोंबिवली :** डोंबिवली रेल्वे पोलिसांच्या कर्तव्यनिष्ठा आणि प्रामाणिकपणामुळे एका प्रवाशाला त्याची पैशांनी भरलेली बॅग परत मिळाली. या बॅगमध्ये १ लाख ६२ हजार रुपये रोख रक्कम होती. डोंबिवली रेल्वे पोलिसांच्या पथकाला गस्त घालत असताना ठाकुर्ली रेल्वे स्थानकावर लोकलच्या डब्यात ही बेवारस बॅग आढळली. पथकाने तपास करून बॅग संबंधित प्रवाशाला परत केली. पैशांनी भरलेली बॅग परत मिळाल्यामुळे प्रवाशाने डोंबिवली रेल्वे पोलिसांचे आभार मानले. डोंबिवली रेल्वे पोलिस स्टेशनचे पोलीस कर्मचारी चौधरी, बांबले, बोईनवाड आणि जाधव हे ठाकुर्ली रेल्वे स्टेशन परिसरात गस्त घालत होते. या वेळी गुरुवारी सायंकाळच्या सुमारास कल्याण स्लो लोकलच्या जनरल डब्यात एक काळ्या रंगाची बेवारस बॅग आढळली. या पथकाने ती बॅग ताब्यात घेऊन डोंबिवली पोलिस ठाण्यात आणली. तपासणी दरम्यान बॅगमध्ये १ लाख ६२ हजार रुपये रोख रक्कम आढळून आली. पोलिसांनी अधिक चौकशी केली असता चौकशीअंती बॅग डोंबिवली पश्चिमेतील रहिवासी जयराम शेट्टी यांची असल्याचे निष्पन्न झाले.

## पनवेल ते उलवे नोड गव्हाण बस चालू करण्याची मागणी

**उरण :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना उलवे नोड गव्हाण विभागातील पदाधिकाऱ्यांची सातत्याने मागणी आहे की पनवेल ते उलवे नोड -गव्हाण अशी बस चालु करण्यात यावी यासाठी त्यांनी फेब्रुवारी महिन्यात आगार प्रमुखांना तसे निवेदन पण दिलेले आहे त्या अनुषंगाने आज पनवेल आगार प्रमुख सुहास चौरे आणि निरीक्षक ज्ञानेश्वर म्हात्रे यांची भेट घेऊन मनसे तर्फे त्यांना स्मरणपत्र देण्यात आले. पनवेल ते उलवे नोड- गव्हाण अशी बस चालु करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली यावेळी उलवे शहर अध्यक्ष राहुल बाबुराव पाटील ,पनवेल तालुका उपाध्यक्ष निर्दोष केशव गोंधळी, उलवे गाव शाखा उपाध्यक्ष संदीप म्हात्रे व ॲड शुभम मढवी उपस्थित होते.

## गाडी पार्किंगच्या वादातून राडा, एकाचा मृत्यू

**कल्याण :** गाडी पार्किंगवरून झालेल्या वादामुळे काही तरुणांमध्ये तीन दिवसांपूर्वी जोरदार राडा झाला होता. या वादातून दोन गटात हाणामारी झाल्याने मानपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या हाणामारीत जखमी झालेल्या बबलू गुप्ता याचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास सुरु असून पोलिस पोस्टमार्टेम रिपोर्टच्या प्रतिक्षेत आहेत. डोंबिवली पूर्वेतील गोळवली परिसरात बबलू बद्रीनाथ गुप्ता या व्यक्तीचे पेपरचे गोडावून आहे. १३ ऑगस्टच्या रात्री मोहंमद जहागीर नावाचा चालक पेपरने भरलेली गाडी घेऊन गोडावून समोर आला. गोडावूनसमोर तीन ते चार दुचाकी उभ्या होत्या. त्यावर काही तरुण बसले होते. चालकाने त्या तरुणांना दुचाकी बाजूला करा; मला त्याठिकाणी गाडी उभी करायची असे सांगितले. चालक गाडी मागे पुढे करीत असताना तरुणांचा आणि चालकाचा वाद झाला. या वादाचे रुपांतर हाणामारीत झाले. कामगार आणि बबलू गुप्ता हे गोदामा बाहेर आले. तोपर्यंत तरुणाच्या गटाने जवळपास २० पेक्षा जास्त तरुणाना बोलावून घेतले होते.

# अखेर 27 गावांचा वाढीव मालमत्ता कर करण्यात आला कमी...

प्रतिनिधी
**डोंबिवली / मुंबई**

२७ गावातील दहा पटीने वाढवलेल्या मालमत्ता कराबाबतचा शासन निर्णय (जीआर) अखेर प्रसिद्ध झाला आहे. डोंबिवलीच्या खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मध्यस्थीने सह्याद्री बंगल्यावर शुक्रवार १६ तारखेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत २७ गाव संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत २७ गावांच्या मुद्द्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आला, ज्यामुळे समितीने मुख्यमंत्री शिंदे यांचे आभार मानले.

बैठकीत निर्णय घेण्यात आला की, २७ गावातील वाढीव मालमत्ता कर कमी करण्याबाबतचा जीआर जारी करण्यात आला आहे आणि पुढील आठवड्यात सुधारीत बिले वितरित करण्यात येणार असल्याचे महापालिकेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



बैठकीला गुलाब वझे, गजानन मांगरुळकर, बंडू पाटील, दत्ता वझे, शरद पाटील, बाळाराम ठाकूर, विजय पाटील, ब्रह्मा माळी, महेश पाटील, युवा सेनेचे सचिव दीपेश म्हात्रे, डोंबिवली शिवसेना शहरप्रमुख राजेश मोरे आदी संघर्ष समितीचे मान्यवर उपस्थित होते. कामगारांच्या वतीने भानुदास पाटील, समर वझे आणि भगवान म्हात्रे यांचीही उपस्थिती होती.

बैठकीत २७ गावातील ४९९ कामगारांना कायमस्वरूपी करण्याचा मार्ग मोकळा झाला असून, त्यांना महापालिका सेवेत सामावून घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, पेंढारकर कॉलेज प्रकरणी प्रशासक नेमणुकीसाठी न्यायालयाच्या आदेशाच्या अधीन राहून त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. २७ गावातील जिल्हा परिषद शाळा महापालिकेकडे वर्ग करण्याबाबत जिल्हा परिषद अधिकाऱ्यांना आणि महापालिकेला सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच, २७ गावातील पायाभूत सुविधा जसे की रस्ते, गटारे आदी तातडीने पुरविण्याबाबत महापालिकेला आदेश देण्यात आले आहेत. पाणी प्रश्न सोडवण्यासाठी प्रस्तावित अमृत योजनेसाठी अधिक निधी मंजूर करण्यात आला असून, ही पाणी योजना लवकरात लवकर कार्यान्वित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आतापर्यंतच्या संघर्ष समितीच्या अथक प्रयत्नांना या निर्णयामुळे चांगले यश मिळाले आहे, असे समितीचे उपाध्यक्ष गुलाब वझे यांनी सांगितले. हा ऐतिहासिक निर्णय मिळवून दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे समितीने आभार मानले आहेत.

# करंजा बंदरात अखेर मासळी बाजार सुरु

## आ. महेश बालदी यांच्या हस्ते काट्याचे पूजन

प्रतिनिधी
**उरण**

मुंबईतील ब्रिटिशकालीन ससून व भाऊचा धक्का बंदरात उतरविण्यात येणारी मासळी आता करंजा येथे उरणच्या करंजा बंदरात खरेदी-विक्री सुरू करण्यात आली आहे. स्वातंत्र्यदिनी उरणचे आ. महेश बालदी यांच्या हस्ते काट्याचे पूजन करून ही सुरुवात करण्यात आली. या वेळी स्थानिक मच्छीमारांनी आनंद व्यक्त केला. त्यामुळे ग्राहकांना घाऊक व स्वस्त मासळी मिळण्याचे मुंबईऐवजी नवीन ठिकाण उपलब्ध झाले आहे.

मासळी खरेदी करायची असेल तर उरणच्या करंजा बंदरात या, असे आवाहन येथील मच्छीमार संस्था आणि मच्छीमारांनी केले आहे. केंद्र व राज्य सरकारच्या १५० कोटी रुपयांच्या भागीदारीतून करंजा येथे



एकाच वेळी ७५० मासेमारी बोटी उभ्या करून मासळीची खरेदी-विक्री करण्याची व्यवस्था असलेले करंजा बंदर सुरू झाले आहे.

नव्या हंगामामुळे नारळी पौर्णिमेनंतर मासेमारी करणाऱ्या बोटी दररोज येऊ लागतील. त्यामुळे या बंदरातील मासेमारी करणारा व्यावसायिक सध्या सुखावला आहे. बालदी यांनी करंजा बंदराच्या उर्वरित कामांसाठी १५४ कोटींचा निधी लवकरच मंजूर होईल आणि त्यानंतर बंदराचे काम पूर्ण करण्यात येईल. मात्र त्यापूर्वी मासळी खरेदी-विक्रीसाठी मत्स्यव्यवसाय विभागाद्वारे तात्पुरती व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले. या बंदरामुळे अनेकांना रोजगार मिळणार आहे. भविष्यात करंजा हे बंदर करंजा-रेवस सागरी पुलामुळे मुंबईला सर्वात जवळचे बंदर ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


# केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथक स्थापन

## नवी मुंबईतील अतिक्रमणांवरील कारवाईतील टाळाटाळ रोखली जाणार

प्रतिनिधी
**नवी मुंबई**

शहरात अनधिकृत बांधकामांचे पेव फुटले असून त्यावरील कारवाईत टाळाटाळ केली जात असल्याचे निदर्शनास आले. तसेच फेरीवाल्यांना कारवाईचा आधीच सुगावा लागत असल्याने अडचणी येतात. परंतु, आता पालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार सात जणांचे मुख्यालय स्तरावर केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथक निर्माण केले आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या आठ विभाग अधिकाऱ्यांना शहरातील कोणत्याही विभागात केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथक त्या ठिकाणी कारवाईचे आदेश देईल



तेथे कारवाई करावी लागणार असून त्यामुळे अतिक्रमणविरोधी कारवाईत पारदर्शकता येणार आहे.

उच्च न्यायालयाने ३१ डिसेंबर २०१५ आधीची आणि नंतरची किती बेकायदा बांधकामे उभी राहिली आहेत याचे सर्वेक्षण करा तसेच २०१५ सालानंतरच्या बेकायदा बांधकामांवर कायद्यानुसार कारवाई करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने यापूर्वीच नवी मुंबई महापालिकेला दिले आहेत. नवी मुंबईत सुमारे चार हजारांच्या वर अनधिकृत बांधकामे आहेत. आता मुख्यालय स्तरावरच केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथक निर्माण केल्याने आता शहरात कारवाईचा सपाटा पाहायला मिळणार असून लागेबांधे निर्माण झाल्याने कारवाईत होणारी टाळाटाळ संपुष्टात येणार आहे. विभाग कार्यालयातील फेरीवाल्यांच्या कारवाईसाठी जाणाऱ्या पथकातील काही जणांचे हितसंबंध निर्माण होऊन अतिक्रमण पथक पोहोचण्याआधीच फेरीवाले तिथून जात असल्याचे पाहायला मिळत होते.

## वाढदिवसासाठी गेलेल्या अल्पवयीन मुलीचे अज्ञाताकडून अपहरण

**डोंबिवली**

वाढदिवसासाठी सोमवारी संध्याकाळी घरातून बाहेर पडलेल्या डोंबिवली पश्चिमेतील जुनी डोंबिवलीतील एका १६ वर्षाच्या मुलीचे अज्ञाताने अपहरण केले असल्याची तक्रार या मुलीच्या आईने विष्णुनगर पोलीस ठाण्यात केली आहे. मुळ सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील असलेले हे कुटुंब नोकरीनिमित्त डोंबिवलीत राहत आहे. सोमवारी संध्याकाळी साडे सहा ते सात वाजण्याच्या दरम्यान हा अपहरणाचा प्रकार घडला आहे. अपहृत मुलीच्या मैत्रिणीचा सोमवारी वाढदिवस होता. सोमवारी संध्याकाळी मैत्रिणीने वाढदिवसानिमित्त घरी मेजवानी ठेवली होती.

# भुमिगत जलवाहिन्यांची गळती शोधण्यासाठी यंत्र खरेदी, ठाणे महापालिकेचा निर्णय

## यंत्रामुळे होणार कमीत कमी रस्ते खोदाई

प्रतिनिधी
**ठाणे**

ठाणे महापालिका क्षेत्राला पाणी पुरवठा करणाऱ्या भुमिगत जलवाहिन्यांमधून होणारी पाणी गळती शोधण्यासाठी पाणी गळती शोध यंत्र (स्मार्ट वॉटर लिक डिटेक्टर) खरेदी करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. अनेकदा भुमिगत जलवाहिन्यांमधून होणारी गळती शोधण्यासाठी काँक्रीट तसेच डांबरी रस्त्यांची मोठ्या प्रमाणात खोदाई करावी लागते. परंतु या यंत्रामुळे पाणी गळती नेमकी कुठे होत आहे, हे शोधता येणार असल्याने तेवढ्याच



भागात रस्ते खोदाई करावे लागणार असून यामुळे रस्ते खोदाई आणि दुरुस्तीवरील खर्चात बचत करणे शक्य होणार आहे.

ठाणे शहराची लोकसंख्या २७ लाखांच्या घरात गेली आहे. ठाणे शहरात सद्यस्थितीत चार स्त्रोतांमार्फत दररोज ५८५ दशलक्ष लीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यामध्ये महापालिकेच्या स्वत:च्या पाणीपुरवठा योजनेतून २५० दशलक्ष लीटर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १३५ दशलक्ष लीटर, स्टेम कंपनीकडून ११५ दशलक्ष लीटर आणि बृहन्मुंबई महापालिकेकडून ८५ दशलक्ष लीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. या स्त्रोतांद्वारे शहरात पाणी पुरवठा करण्यासाठी जलवाहिन्यांचे जाळे विणण्यात आलेले आहे. या वाहिन्या शहरातील रस्ते आणि जमीनीखालून टाकण्यात आलेल्या आहेत.

# घोडबंदरच्या राजा शिवाजी विद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा




प्रतिनिधी
**ठाणे**

छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या किल्ले घोडबंदर गांव पायथ्याशी असलेल्या राजा शिवाजी विद्यालय घोडबंदर गाव, मराठी माध्यम व इंग्रजी माध्यमाच्या यांचे संयुक्त विद्यमाने १५ ऑगस्ट रोजी ७८ वा स्वातंत्र्य दिन सोहळा ध्वजारोहणाचे मानकरी भारत देशाचे सुपुत्र प्रशांत गुणाजी बांदल (माजी सैनिक भारतीय स्थलसेना ) यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

घोडबंदर गांव पायथ्याशी असलेल्या राजा शिवाजी विद्यालय घोडबंदर गाव, मराठी माध्यम व इंग्रजी माध्यमाच्या यांचे संयुक्त विद्यमाने १५ ऑगस्ट २०२४ ७८ वा स्वातंत्र्य दिन सोहळा ध्वजारोहणाचे मानकरी भारत देशाचे सुपुत्र माननीय प्रशांत गुणाजी बांदल सर (माजी सैनिक भारतीय स्थलसेना) यांच्या शुभहस्ते संपन्न झाला या शुभप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष जयवंत जगन्नाथ वैती, उपाध्यक्ष चंद्रकांत पांडुरंग तरे, कार्याध्यक्ष श्री केशवराव रामभाऊ घरत, कार्यकारी मंडळ तसेच आजीव सभासद, पालक वर्ग व ग्रामस्थ उत्सव मंडळाचे कार्याध्यक्ष रमेश पांडुरंग तरे, बाबा अमरनाथ ग्रुपचे संस्थापक नंदलाल पांडुरंग तरे, जय योगेश्वर महिला मंडळाच्या अध्यक्ष सौ. नमिता सागर वैती व महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक ७८ व्या ध्वजारोहणाचे साक्षीदार बनले.

## निर्जनस्थळी पडलेल्या बॅगेत नग्नावस्थेत सापडला मृतदेह

**कल्याण**

कल्याण तालुक्यातील टिटवाळानजीक असलेल्या वरप गावाजवळ निर्जनस्थळी पडलेल्या बेवारस बॅगेत मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली. या बॅगमध्ये अंदाजे ६५ ते ७० वयोगटातील व्यक्तीचा नग्नावस्थेत मृतदेह आढळला. टिटवाळाजवळच्या वरप गावानजीक निर्मनुष्य ठिकाणी एक बॅग आढळून आली. या बॅगमध्ये कुजलेल्या आणि नग्नावस्थेत मृतदेह होता. वृद्धाची हत्या झाल्याचा अंदाज प्रथमदर्शनी व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याण तालुक्यातील वरप गावातील काही जण घटनास्थळाच्या परिसरातून जात होते. त्यांना निर्जनस्थळी एक बेवारस बॅग दिसून आली. गावकऱ्यांनी तात्काळ ही बाब कल्याण तालुका पोलिसांना कळवली.

# नवी मुंबईत भगवा फडकेल - शिवसेना उपनेते विजय नाहटा



**नवी मुंबई**

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सामान्य जनतेसाठी विविध सकारात्मक निर्णय घेत आहेत. जनतेशी नाळ जोडलेला मुख्यमंत्री आपणास लाभला असल्याने नवी मुंबईत मोठया संख्येने शिवसेना पक्षात कार्यकर्त्यांचे पक्ष प्रवेश होत आहेत. शिवसैनिकानी जनतेमध्ये मिसळून काम करावीत आगामी काळात नवी मुंबईत भगवा फडकल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन शिवसेना उपनेते विजय नाहटा यांनी नेरुळ येथे बोलताना केले.

शिवसेना बेलापूर विधानसभा मतदार संघांतील नेरुळ( पूर्व ) येथील जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या हस्ते करण्यात आहे. यावेळी व्यासपीठावर नवी मुंबई जिल्हा प्रमुख विजय चौगुले, उपजिल्हा प्रमुख गणपत शेलार, मिलिंद सूर्यराव, दिलीप घोडेकर, दिपक सिंग, संजय कपूर, अजित सावंत, संतोष दळवी, रोहिदास पाटील, संजय भोसले, सहसपर्क प्रमुख ज्ञानेश्वर सुतार, रामचंद्र पाटील, महिला जिल्हा संघटक सरोजताई पाटील,शहर प्रमुख विजय माने, अरुण गुरव आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना विजय नाहटा पुढे म्हणाले की, शिवसेनेच्या माध्यमातून युवक, महिला, जेष्ठ नागरिकापासून शालेय विध्यार्थी यांच्यासाठी वर्षभर अविरतपने कार्यक्रम सुरु असतात. बेलापूर विधानसभा मतदार संघातील नागरिकांच्या समस्या लगेचच मार्गी लागव्यात यासाठी ठिकठिकाणी जनसंपर्क कार्यालय सुरु करण्यात आल्याचे शिवसेना उपनेते विजय नाहटा यांनी सांगितले.







**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
कार्यकारी अभियंता, प्रकल्प विद्युत विभाग, मुंबई बांधकाम भवन, ५ वा मजला, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४००००१.
ई-मेलelapriconsts.ce@mahapwd.gov.in दुरध्वनी क्र. : 022-22013784

**ई निविदा सुचना क्र. ०६ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता, प्रकल्प विद्युत विभाग, सा.बां. विभाग, यांचे कार्यालय, बांधकाम भवन, ५ वा मजला, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४००००१ हे सविस्तर निविदा सूचनेमध्ये नमूद प्रमाणे कामांच्या विद्युत अनुज्ञाप्तीधारक विद्युत ठेकेदाराकडून ब-१ ई निविदा मागवित आहोत. को-या निविदा नमुना अ.क्र. ०१ च्या कामाची https://mahatenders.gov.in व अ.क्र. ०२ ते ०४ च्या कामाची https://mahapwd.gov.in (Pay PWD Online) वर दर्शविल्याप्रमाणे अ.क्र. ०१ दि.१६.०८.२०१४ रोजी पासून दि. २६.०८.२०२४ रोजी पर्यंत व अ.क्र.०२ ते ०४ दि. १६.०८.२०२४ रोजी पासून दि. ३१.०८.२०२४ रोजी पर्यंत ऑनलाईन डाऊनलोड करण्याकरिता उपलब्ध होतील व पूर्ण भरुन निविदा अ.क्र. ०१ दि.२७.०८.२०२४ पूर्वी किंवा त्याच दिवशी तसेच अ.क्र. ०२ ते ०४ दि. ०२.०९.२०२४ पूर्वी किंवा त्याच दिवशी १३.०० वाजेपर्यंत ऑनलाईन निविदेच्या ठोक प्रती स्विकारल्या जातील. शक्य झाल्यास अ. क्र. ०१ निविदा दि. २७.०८.२०२४ रोजी १४.०० वाजता तसेच अ.क्र.०२ ते ०४ ची निविदा दि.०२.०९.२०२४ रोजी १४.०० वाजता कार्यकारी अभियंता, प्रकल्प विद्युत विभाग, सा.बां. विभाग, मुंबई यांचे कार्यालयात उघडल्या जातील. ज्या ठेकेदारांनी निविदा घेतली असेल अशा ठेकेदारांनी अथवा त्यांच्या प्रतिनिधीनी ओळखपत्रा सह उपस्थित रहावे. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, प्रकल्प विद्युत विभाग, सा.बां. विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारण्यात येणार नाही.

Name Of Work : 1. Est. No. OW / 11PO4-27/2021-22 (REVISED24-25 ) Providing Renovation to Electrical Installation with Airconditioning Unit in Auditorium on 6th floor Main Building at Cama & Albless Hospital, Mumbai Rs.17,12,051/-
2. Est No OW/55P04-10/2023-24, Providing UPS to MASWAN Department on 11th Floor at New Administrative Building, Mumbai. Rs.4,55,271/-
3. Est PESD / CAMA / OW/4517/2024-25, Providing renovation to EI work with Fittings, Fans, etc at One stop centre at Cama & Albless Hospital, Mumbai Rs.3,91,387/-
4. Est PESD/NAB/SR/4206/2024-25, Providing Semi-Skilled Labour as Pump Operator at New Administrative Building, Mumbai Rs. 6,55,920/-

कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास नोटीसची प्रत विनामुल्य मिळू शकेल.
जा.क्र. काअ / प्रविवि/नि.लि./८४५/ २०२४, दिनांक १२/०८/२०२४

**स्वाक्षरी/-**
**कार्यकारी अभियंता**
**प्रकल्प विद्युत विभाग**
**सा.बां. विभाग, मुंबई**

डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/सी२०८१

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मोखाडा यांचे न्यायालयात**

**सुनावणी नोटीस**

क्र.महसूल/प्रशासन/कावि/- २१९/२०२४
दिनांक :-२८/०२/२०२४

| | |
|---|---|
| श्री. दत्तू त्र्यंबक वाघ खोडाळा,<br>रा. खोडाळा<br>ता. मोखाडा जि. पालघर | अर्जदार |
| विरुद्ध | |
| ग्रामपंचायत कार्यालय खोडाळा,<br>ता-मोखाडा जि-पालघर | गैरअर्जदार |

**जन्म मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ अन्वये सुनावणी**
जन्म नोंद होऊन जन्म दाखला मिळणेबाबत प्राप्त अर्ज

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, अर्जदार श्री. दत्तू त्र्यंबक वाघ, यांनी त्यांचे स्वताच्या आईच्या मृत्युची/ जन्माची नोंद करणे बाबत अर्ज सादर केलेला आहे. कै. सखुबाई त्र्यंबक वाघ, यांचा मृत्यु - दि.२०/०५/१९८६ रोजी - मौजे - खोडाळा येथे जन्म झालेला आहे. तरी त्यांचे मृत्युची नोंद नसल्याने त्यांचे मृत्यु नोंद करुन मृत्यु दाखला मिळणेबाबत या न्यायालयात दि.२०/०६/२०२४ रोजी अर्ज दाखल केला आहे.
तरी सदर अर्जाचे अनुषंगाने या न्यायालयात दिनांक २४/०७/२०२४ रोजी सकाळी ११:०० वा. सुनावणी ठेवणेत आलेली आहे. तरी सदर सुनावणीसाठी आपण आपलेकडील उपलब्ध सर्व पुराव्यासह उपस्थित राहावे. सदर सुनावणीस आपण गैरहजर राहील्यास एकतर्फी निर्णय घेऊन नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
**प्रत : गटविकास अधिकारी, पंचायत समीती मोखाडा,**
२/- सदरची सुनवाणी नोटीस गैरअर्जदार यांना मुदतीत बजावून पोहोच या कार्यालयास सादर करावी.
**प्रत : तलाठी सजा - खोडाळा**
२/- सदरची सुनवाणी नोटीस अर्जदार यांना मुदतीत बजाऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.

**सही /-**
**निवासी नायब तहसीलदार**
**तथा कार्यकारी दंडाधिकारी मोखाडा**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मोखाडा यांचे न्यायालयात**

**सुनावणी नोटीस**

क्र.महसूल/प्रशासन/कावि/- २२०/२०२४
दिनांक :-०५/०७/२०२४

| | |
|---|---|
| श्री. दत्तू त्र्यंबक वाघ खोडाळा,<br>रा. खोडाळा<br>ता. मोखाडा जि. पालघर | अर्जदार |
| विरुद्ध | |
| ग्रामपंचायत कार्यालय खोडाळा,<br>ता-मोखाडा जि-पालघर | गैरअर्जदार |

**जन्म मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ अन्वये सुनावणी**
जन्म नोंद होऊन जन्म दाखला मिळणेबाबत प्राप्त अर्ज

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, अर्जदार श्री. दत्तू त्र्यंबक वाघ यांनी त्यांचे स्वताच्या भवजयीच्या मृत्युची/ जन्माची नोंद करणे बाबत अर्ज सादर केलेला आहे. कै. लक्ष्मी लक्ष्मण वाघ, यांचा मृत्यु - दि.०३/०८/१९७१ रोजी - मौजे - खोडाळा येथे जन्म झालेला आहे. तरी त्यांचे मृत्युची नोंद नसल्याने त्यांचे मृत्यु नोंद करुन मृत्यु दाखला मिळणेबाबत या न्यायालयात दि.२०/०६/२०२४ रोजी अर्ज दाखल केला आहे.
तरी सदर अर्जाचे अनुषंगाने या न्यायालयात दिनांक. /०७/२०२४ रोजी सकाळी ११:०० वा. सुनावणी ठेवणेत आलेली आहे. तरी सदर सुनावणीसाठी आपण आपलेकडील उपलब्ध सर्व पुराव्यासह उपस्थित राहावे. सदर सुनावणीस आपण गैरहजर राहील्यास एकतर्फी निर्णय घेऊन नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
**प्रत : गटविकास अधिकारी, पंचायत समीती मोखाडा,**
निवासी नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मोखाडा
२/- सदरची सुनवाणी नोटीस गैरअर्जदार यांना मुदतीत बजावून पोहोच या कार्यालयास सादर करावी.
**प्रत : तलाठी सजा - खोडाळा**
२/- सदरची सुनवाणी नोटीस अर्जदार यांना मुदतीत बजाऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.

**सही /-**
**निवासी नायब तहसीलदार**
**तथा कार्यकारी दंडाधिकारी मोखाडा**

## आरक्षणासाठी उड्डाणपुलावर चढून तरुणाचे आंदोलन

**पुणे :** आर्थिक वादातून अभियांत्रिकी महाविद्यालयातील चौकातील उड्डाणपुलावरील सज्जावर चढून तरुणाने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. अग्निशमन दलाच्या जवानांकडून सज्जावर चढलेल्या तरुणाची सुखरुप सुटका करण्यात आली. तरुणाला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. अभियांत्रिकी महाविद्यालय चौकातील उड्डाणपुलावरील सज्जात तरुण थांबला असल्याची माहिती नागरिकांनी अग्निशमन दलाला दिली. पोलिसांनी या घटनेची माहिती अग्निशमन दलाला कळविली. त्यानंतर तरुणाला सज्जावरुन उतरविण्यासाठी अग्निशमन दलाचे जवान तेथे रवान झाले. नायडू तसेच कसबा अग्निशमन केंद्रातील रेस्क्यू व्हॅन तेथे रवाना करण्यात आली. तरुण पुलाच्या मधोमध थांबला होता. पोलिसांनी त्याला खाली उतरण्यास सांगितले. मात्र, तो ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जवानांनी त्याच्याशी संवाद साधला. अग्निशमन दलाचे वाहनचालक करीम पठाण, आकाश डुंबळे, विजय पिंजण, पंकज पाटील, अक्षय कांबळे, नवनाथ जेडगे, संतोष अरगडे, संदीप पवार, मयूर चव्हाण, प्रदीप पेडणेकर यांनी शिडीचा वापर करुन तरुणाला सुखरुप खाली उतरविले.

## महत्त्वाचे

### मेट्रो स्थानक परिसरात तरुणांची लूट

**पुणे :** महाविद्यालयीन तरुणांना धमकावून त्यांच्याकडील तीन मोबाइल संच चोरट्यांनी चोरून नेण्यात आल्याची घटना कर्वे रस्त्यावरील गरवारे मेट्रो स्थानक परिसरात घडली. याप्रकरणी डेक्कन पोलिसांनी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला.याबाबत एका तरुणाने डेक्कन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. तक्रारदार तरुण आणि त्याचे दोन मित्र कर्वे रस्त्यावरुन निघाले होते. त्यावेळी गरवार मेट्रो स्थानकाजवळ दुचाकीवरून आलेल्या चौघांनी तरुण आणि त्याच्या मित्रांना अडवले. त्यापैकी एका चोरट्याने मोबाइल संच संपर्क साधण्यासाठी मागितला. तरुणासह त्याच्या मित्राला शिवीगाळ करुन चोरट्यांनी धमकावले. तरुणासह त्याच्या मित्रांकडील तीन मोबाइल संच चोरुन चोरटे पसार झाले. पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय जाधव तपास करत आहेत.

### शाळेच्या शिक्षकांकडून राष्ट्रध्वजाचा अवमान

**अकोला :** शहरातील जिल्हा परिषद मराठी मुलांची शाळा येथे ७८ व्या स्वातंत्र दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम १५ ऑगस्ट रोजी पार पडला. शाळेतील तिन्ही शिक्षिकांपैकी एकही महिला शिक्षिका राष्ट्रध्वजाच्या देखरेखीसाठी शाळेत न थांबता सर्व नियम धाब्यावर बसवून शाळेच्या वर्गखोल्यांना कुलूप लावून अकोला येथे निघून गेल्या. शाळेच्या मुख्याध्यापिका तथा केंद्रप्रमुख या बाहेरगावी गेल्याने शाळेतील राष्ट्रध्वज दिवसभर बेवारस स्थितीत होता. संध्याकाळचे ६:४० वाजले तरी राष्ट्रध्वज खाली उतरविण्यात आला नाही. शिवाय त्याठिकाणी शाळेच्या महिला शिक्षिका हजर नसल्याची माहिती काही व्यक्तींना मिळाली. हा प्रकार तहसिलदार राजेश वझीरे, पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे व शिक्षण विस्तार अधिकारी संदिप मालवे यांना दिली. त्यांनी एका शिक्षिकेला फोन लावला. रात्री ७:३० वाजता धोत्रे व काळणे नामक दोन महिला शिक्षिका हजर झाल्या.

### रविवार पेठेत साडेसहा लाखांचे मेफेड्रोन ड्रग्ज जप्त

**पुणे :** मेफेड्रोनची विक्री करणाऱ्य सराइताला अमली पदार्थ विरोधी पथकाने रविवार पेठेत पकडले. त्याच्याकडून साडेसहा लाख रुपयांचे ३२ ग्रॅम मेफेड्रोन जप्त करण्यात आले. सागर जयसिंग चव्हाण (वय ३४, रा. गायत्री भवनशेजारी, रविवार पेठ) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. रविवार पेठेत अमली पदार्थ विरोधी पथकातील पोलीस कर्मचारी साहिल शेख गस्त घालत होते. त्यावेळी सागर चव्हाण मेफेड्रोन विक्रीच्या तयारीत असल्याची माहिती शेख यांना मिळाली. पोलिसांच्या पथकाने सापळा लावून चव्हाणला पकडले. त्याची झडती घेण्यात आली. त्याच्याकडून मेफेड्रोन जप्त करण्यात आले. चव्हाणकडून मेफेड्रोनसह सात लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अतिरिक्त आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त निखिल पिंगळे, सहायक आयुक्त सतीश गोवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, उपनिरीक्षक रामकृष्ण दळवी, साहिल शेख, अझीम शेख, चेतन गायकवाड, रवींद्र रोकडे, संदीप जाधव, योगेश मांढरे, नीलम पाटील यांनी ही कारवाई केली.

# आम्ही काहीही सहन करु शकतो मात्र धर्माचा अवमान नाही

## पोलीस आयुक्तांच्या भेटीनंतर इम्तियाज जलील यांचं वक्तव्य

प्रतिनिधी
■ संभाजीनगर

महंत रामगिरी महाराज यांच्या वादग्रस्त वक्तव्याचे पडसाद आज छत्रपती संभाजीनगर शहरात बघायला मिळाले. संभाजीनगरमध्ये शेकडो तरुणांचा जमाव आज पोलीस ठाण्याबाहेर जमला. यावेळी पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. आंदोलकांनी महंत रामगिरी महाराजांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. यानंतर छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी पोलीस आयुक्तांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी पोलीस आयुक्तांकडे महंत रामगिरी महाराज यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली. इम्तियाज जलील यांनी पोलीस आयुक्तांच्या भेटीनंतर माध्यमांना प्रतिक्रिया दिली.

"संबंधित कार्यक्रम ठेवणाऱ्यांवर आणि बोलणाऱ्यांवर देखील कारवाई व्हावी, अशी आम्ही मागणी केली आहे. एक डेलिगेशन घेऊन आम्ही पोलीस आयुक्तांकडे गेलो होतो. आमच्या मनात असलेला राग आम्ही त्यांच्यासमोर व्यक्त केला. मुसलमान जगात प्रत्येक गोष्ट सहन करू शकतो, मात्र आमच्या देवा-धर्माबद्दल बोलणाऱ्यांचे सहन करू शकत नाही. त्यांचे वक्तव्य हे खरंच चुकीचे आहे", अशी भूमिका इम्तियाज जलील यांनी मांडली.

"आमच्या मुसलमान बांधवांनी कधीच इतर धर्मियांबाबत असे वक्तव्य केले नाही. या कृत्याबाबत



आमच्या समाज बांधवांमध्ये नाराजी आहे. आमचे अनेक धर्मगुरू आज त्यांच्या कृत्यामुळे जेलमध्ये आहेत. मग यांना का सूट देत आहेत? या देशाची शांतता जर टिकवून ठेवायची असेल तर अशा लोकांना प्रतिबंध घालायला हवे", अशी मागणी इम्तियाज जलील यांनी केली.

"नाशिकमध्ये देखील सकल हिंदू समाजाच्या वतीने नमाजच्या वेळेस मोर्चा काढला जात आहे. नंदुरबारमध्ये देखील आज जुम्माच्या दिवशी असे आंदोलन केले जात आहे. जर बांगलादेशमध्ये हिंदूंवर अत्याचार होत असतील तर तिथे मुसलमानांवर देखील अत्याचार होत आहेत. मला असं वाटतं ही एक विचार करुन आखलेला कट आहे", असा दावा जलील यांनी केला.

"आमच्या नबीच्या विरोधात जगातील कुठलाच मुसलमान सहन करू शकत नाही. मी तमाम तरुणांना आवाहन करतो की आपल्या रागाला शांत ठेवा. प्रशासन जी भूमिका घेईल ती आम्हाला मान्य असेल, अशा भूमिकेत आम्ही आहोत. दुसरे आम्ही असे निवेदन दिले आहे की, अशा काही वेबसाईट चालू आहेत ज्या मुस्लिम धर्माच्या विरोधात आहेत. आम्हाला पोलीस सांगतात, शुक्रवारी तुम्हांला आंदोलन करू देणार नाही मग यांना का परवानगी आहे?", असा सवाल इम्तियाज जलील यांनी केला.

नाशिकमध्ये आज हे प्रकरण घडलेलं आहे त्या ठिकाणी मुख्यमंत्री सभा घेत आहेत हे अत्यंत निंदनीय आहे. लोक आता हुशार झाले आहेत. त्यांना सर्व कळतं की यामागे काय काय खेळ असू शकतात, कशाप्रकारे आम्हाला त्यात निशाण्यावर ठेवले जात आहे.


# मतदार यादीत एकाच व्यक्तीचे पाच ठिकाणी नावं

## मालेगावात धक्कादायक प्रकार उघड

प्रतिनिधी
■ मालेगाव

आगामी विधानसभेच्या पार्श्वभूमीवर मालेगाव बाह्य मतदारसंघात मतदारांचा आकडा फुगविण्यासाठी एकाच मतदाराची पाच ठिकाणी बोगस नोंद करण्यात आली आहे. अशा तीन दिवसात मालेगाव बाह्य विधानसभेत तब्बल 9 हजार बोगस मतदारांची नोंद करण्यात आली आहे. विशेष म्हणजे शासकीय यंत्रनेला हाताशी धरून हा प्रकार करण्यात आल्याचा भंडाफोड शिवसेना ठाकरे गट आणि बारा बलुतेदार संघटनेच्यावतीने करण्यात आला. या प्रकरणाची निवडणूक आयोगाने दखल घ्यावी, अन्यथा ठाकरे गट रस्त्यावर उतरेल, असाही इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

मालेगाव बाह्य विधानसभा मतदारसंघात बोगस मतदारांची नोंदणी होत असल्याचा संशय शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांना आला होता. त्यामुळे ठाकरे गटाने मतदार याद्यांची तपासणी करण्याची मोहीम हाती घेतली. त्यात एकाच मतदार यादीत एकाच व्यक्तीचे नाव आणि फोटो चार ते पाच ठिकाणी आढळून आले. प्रशासनाने आगामी विधानसभा निवडणुका पार्शदर्शक व्हाव्यात, यासाठी वापरण्यात येणाऱ्या मतदार यादीत पारदर्शकता ठेवणे गरजेचे आहे. यासाठी एक व्यक्ती एक मत या आधारावर होण्यासाठी संबधित अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. असे असताना मतदार यादीत एकाच मतदाराचे एका पेक्षा जास्त नावे आढळून येत आहेत. आतापर्यंत आठ हजार मतदारांची दोन, तीन, काहींचे चार ठिकाणी नाव आढळली



आहेत, असा दावा ठाकरे गटाने केला आहे.

बोगस मतदार आढळून आल्यासंदर्भात ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी नावांच्या पुराव्यासहित असलेली यादी प्रशासनाला सादर केली आहे. तसेच मालेगाव मध्य आणि बाह्य विधानसभा, सटाणा (बागलाण), नाशिक सिडको या मतदारसंघातील मतदारांचा मालेगाव बाह्य विधानसभा मतदारसंघामध्ये समावेश असल्याचे सांगण्यात आले. एकापेक्षा जास्त मतदार असल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच सदरील व्यक्तींचे इतर ठिकाणी असलेले मतदान रद्द करण्यात यावे, अशी मागणी ठाकरे गटाकडून करण्यात आली.

प्रशासनाना पुरावे सादर करण्यात येणार असून प्रशासनाने पारदर्शकपणे कामे करावी, सादर केलेल्या प्राव्याची यादीची शाहनिशा करावी. एका पेक्षा जास्त ठिकाणी असलेली नावे त्वरित रद्द करावेत. यासाठी नाशिक जिल्ह्याचे जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास आदेश द्यावे, जबाबदार असलेले बीएलओ विरुद्ध कारवाईचे आदेश व्हावे, अन्यथा उच्च न्यायालयात दाद मागणार, असा इशारा देण्यात आल्याची माहिती बारा बलुतेदार संघटनेचे संस्थापक बंडू काका बच्छाव यांनी दिली.

# आरटीईच्या प्रतीक्षा यादीतील 23 हजार 850 विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी

प्रतिनिधी
■ पुणे

शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत प्रतीक्षा यादीतील २३ हजार ८५० विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला आहे. प्रतीक्षा यादीतील प्रवेश प्रक्रिया २६ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी ही माहिती दिली. प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे आरटीई प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. यंदा राज्यातील ९ हजार २१७ शाळांमध्ये १ लाख ५ हजार २४२ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी दाखल झालेल्या २ लाख ४२ हजार ५१६ अर्जांतून ९३ हजार ९ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. प्रतीक्षा यादीत ७१ हजार २७६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

सुरुवातीला २३ ते ३१ जुलै या कालावधीत प्रवेशासाठी संधी दिल्यानंतर आणखी दोनवेळा मुदतवाढ देण्यात आली होती. सोडतीद्वारे प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांनंतर आता प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. आरटीई संकेतस्थळावरील आकडेवारीनुसार शुक्रवारी सायंकाळपर्यंत एकूण ६१ हजार १९३ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले होते. त्यामुळे अद्यापही ४४ हजारांहून अधिक जागा रिक्त आहेत.

नियमित विद्यार्थ्यांना पुरेशी संधी दिल्यानंतर आता प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी देण्यात येत आहे. त्यानुसार पहिल्या प्रतीक्षा यादीतून २३ हजार ८५० विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी निवड झाली आहे. प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांचे प्रवेश २६ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत असे गोसावी यांनी सांगितले.

# विदर्भात लव्ह जिहादचा प्रकार?

## पोलिसांनी जबाब नोंदविल्यानंतर तरुणी हैदराबाद येथे रवाना

प्रतिनिधी
■ हिंगोली

विदर्भातील एका सेलमध्ये काम करणाऱ्या तरुणाने एका तरुणीशी ओळख झाल्यानंतर तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढल्याचा प्रकार वसमत येथे उघड झाला आहे. या प्रकरणात पोलिसांनी तरुणीचा जबाब नोंदविला, मात्र त्यानंतर काही वेळातच ती हैदराबाद येथे रवाना झाल्याचे सुत्रांनी सांगितले. या घटनेमुळे वसमत शहरातील वातावरण चांगलेच तापले होते.

पोलिस विभागातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वसमत शहरातील एक तरुण विदर्भात एका सेलमध्ये कामाला होता. त्या ठिकाणी काम करताना त्याची एका तरुणीसोबत ओळख झाली. त्याने तरुणीला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तरुणीच्या कुटुंबीयांना या




प्रकाराची माहितीही नव्हती. आपण शिक्षण घेण्यासाठी बाहेर राहात असल्याचे तिने आपल्या कुटुंबाला भासविले. पण प्रत्यक्षात ती त्या मुलासोबतच राहू लागली.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी तो तरुण अन् तरुणी वसमत येथे एका ठिकाणी खोली करून राहू लागले. त्या तरुणीच्या पोटात दुखत असल्याने तिची सोनोग्राफी करण्यासाठी तिला गुरुवारी ता. १५ रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास रुग्णालयात आणले जात होते. सदर प्रकार काही तरुणांच्या लक्षात आल्यानंतर तरुणांनी त्या तरुणाला जाब विचारला. यावेळी झालेल्या गोंधळात काही जणांनी त्या तरुणीला बाजूला नेऊन तेथून पळवून लावले.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर वसमत शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक कुंदनकुमार वाघमारे यांनी वाढीव पोलिस बंदोबस्त तैनात केला. त्यानंतर घटनास्थळावर जाऊन त्या तरुणाला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्या तरुणाची चौकशी करून त्याचा जवाब नोंदविला. तर तरुणी नांदेड येथे गेल्याचे लक्षात आल्यानंतर पोलिसांनी नांदेड येथे जाऊन त्या तरुणीचा जबाब नोंदविला आहे. या प्रकाराची माहिती पोलिसांनी तरुणीच्या कुटुंबीयांनाही दिली आहे. त्यानंतर त्या तरुणीने हैदराबाद गाठले.

# मुख्यमंत्री शिंदेंसाठी लाडक्या बहिणीने मंगळसूत्र मोडून पाठवली सोन्याची राखी

प्रतिनिधी
■ सांगली

राज्यात लाडकी बहीण योजनेचे पैसे अनेक महिलांच्या खात्यावर जमा झाले आहेत. हे पैसे काढण्यासाठी बँकांसमोर एकच झुंबड उडाली आहे. तर काही ठिकाणी महिला भावूक पण झाल्या आहेत. सांगली जिल्ह्यातील या लाडक्या बहिणीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मंगळसूत्र मोडत एक अनोखे गिफ्ट दिले आहे. ही महागडी भेट पाहून मुख्यमंत्र्यांना सूखद धक्का बसल्याशिवाय राहणार नाही. काय दिले लाडक्या बहिणीने गिफ्ट?

महिलांसाठी लागू करण्यात आलेल्या माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा होऊ लागले, याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सांगलीतल्या एका महिलेने मुख्यमंत्र्यांना थेट आपल्या मंगळसूत्राची राखी बनवुन भेट केली आहे.स्टेला दास सकटे या महिलेने आपल्या गळयातील सोन्याचे




मंगळसूत्र राखीच्या स्वरूपात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेट म्हणून दिली आहे.

सांगली जिल्हाधिकारी कार्यालयात हे अर्धे तोळे सोन्याच्या दागिन्याची राखी सुपूर्द केली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांच्या खात्यावर पैसे जमा होऊ लागले आहेत आणि ही योजना अशाच पद्धतीने सुरू राहावी,अशी मागणी करत मुख्यमंत्र्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ही अनोखी भेट दिल्याचं स्टेला सकटे यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांक़डून अजून मोठी अपेक्षा नाही. पण त्यांनी ही योजना आणि इतर योजना सुरु ठेवाव्यात अशी विनंती त्यांनी केली आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संपूर्ण राज्यांमध्ये चालू केली आहे त्याचा पहिला हप्ता महाराष्ट्रातील काही महिलांना 15 ऑगस्ट रोजी मिळाला आहे त्यामुळे सांगलीच्या स्टेला सकटे या महिलेने आपल्याला मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंतर्गत पैसे मिळाल्याने आपले मंगळसूत्र मोडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना त्यांचे आभार मानण्यासाठी राखी पाठवली आहे.

### 'लाडकी बहीण' कार्यक्रमामुळे पुण्यातील वाहतुकीत बदल

■ पिंपरी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची रक्कम लाभार्थी महिलांच्या बँक खात्यावर प्रातिनिधिक स्वरूपात जमा करण्यासाठी श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे उद्या (शनिवारी) राज्यस्तरीय कार्यक्रम होणार आहे. त्यामुळे बालेवाडी परिसरातील वाहतुकीत वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक मंत्री आणि अति महत्वाच्या व्यक्ती तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहणार आहेत. या पार्श्वभूमीवर बालेवाडी परिसरातील वाहतूक वळविण्यात आली आहे. बालेवाडी क्रीडा संकुल जवळील राधा चौक ते मुळा नदी पुलापर्यंत सेवा रस्त्यावर प्रवेशबंदी करण्यात आली आहे. कार्यक्रमाला येणारी वाहने आणि अत्यावश्यक सेवेतील वाहने या मार्गाने जाऊ शकतील. बालेवाडी येथील बंटार भवन व आजूबाजूच्या परिसरात वाहनांची पार्किंग करण्यात येत असल्याने पार्किंग ठिकाणच्या मार्गावर जड, अवजड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात आली आहे. कार्यक्रमाला येणारी वाहने आणि प्रवासी बसेस या मार्गाने जाऊ शकतील. हा बदल शनिवारी सकाळी सहा ते रात्री आठ वाजेपर्यंत असणार आहे.

# रक्षाबंधनाची ओवाळणी म्हणून महाराष्ट्र नशामुक्त करा

### शेकडो पत्रे पाठवून महिलांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

प्रतिनिधी
■ धुळे

रक्षाबंधनाच्या निमित्ताने धुळे तालुक्यातील फागणे येथून शेकडो महिलांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहिले आहे. महिलांनी या पत्रांच्या माध्यमातून या लाडक्या बहिणींना रक्षाबंधनाची ओवाळणी म्हणून नशा मुक्त महाराष्ट्र करण्याची मागणी केली आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत सध्या महिलांच्या खात्यात तीन हजार रुपये जमा केले जात आहेत.



रक्षाबंधनानिमित्ताने हि भेट म्हटले जात आहे. दरम्यान याच अनुषंगाने लाडक्या बहिणींना खऱ्या अर्थाने रक्षाबंधनाची ओवाळणी म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दारूबंदी करावी; अशी देखील मागणी यावेळी या लाडक्या बहिणींनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केली आहे. फागणे या गावातील शेकडो महिलांनी ही मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून केली आहे.

## डाक विभागात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गौरव

■ संभाजीनगर

क्षेत्रीय डाक विभागात पोस्ट सेव्हिंग बँक, आधार नोंदणी, सीएससी व्यवहार, इंडिया पोस्ट पेमेंटस बँक व्यवहार, पोस्टल विमा, मेल डिलिव्हरी, आदी विविध श्रेणीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या २५० कर्मचाारी व अधिकारी यांचा विभागीय पोस्टमास्टर जनरल अदनान अहमद यांनी उत्कृष्ट पुरस्कार देऊन सन्मानित केले. कार्यक्रमावेळी छत्रपती संभाजीनगर क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या विभागातील पोस्टल कर्मचारी आणि अधिकारी व त्याचे कुटुंबीय मोठ्या संखेने उपस्थित होते. "नया साल - नया जोश" ही योजना मुख्य पोस्टमास्टर जनरल मुंबई यांनी २९ जानेवारी रोजी सुरूवात केली होती. ३१ मार्चपर्यंत राज्यातील सर्वच जिल्ह्यात योजना प्रभावीपणे राबवण्यात आली.

# इतकं सुंदर भव्य दिव्य मंदिर... पण स्वच्छतेचे काय?

## अजित पवारांनी केली विश्वस्तांची कानउघडणी

प्रतिनिधी
■ पुणे

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार हे आज पुणे दौऱ्यावरती आहेत. आज (शुक्रवारी) सकाळी अजित पवार यांनी रविवार पेठेतील एका सोन्याच्या दालनाचे उद्घाटन केले. उद्घाटन झाल्यावर शेजारीच असलेल्या माहेश्वरी मंदिरामध्ये अजित पवारांनी दर्शन घेतलं. यावेळी मंदिराच्या प्रवेश द्वाराजवळ असलेला कचरा आणि अस्वच्छता पाहून अजित पवारांनी मंदिर समितीच्या सदस्यांना सुनावलं आहे.

त्याचबरोबर मंदिरात बांधलेल्या तारा आणि बाकी गोष्टीवरून देखील अजित पवार बोलले. इतकं सुंदर मंदिर आहे, हे काय लावलंय, बाहेर आल्यावर घाण दिसली. इतकं मोठं मंदिर आहे, इतकी माणसं येतात, मंदिर स्वच्छ ठेवायचं. महानगरपालिका झाडेल तेव्हा झाडेल. मंदिरात येताना अशी घाण दिसते बरोबर नाही हे, असं देखील पवार यावेळी म्हणालेत.



मंदिरात बांधलेली तार पाहून ही कसली तार आहे बांधली आहे, तिकडे वायरी लोंबत आहेत, मी बोललं की तुम्हाला दिसतं मग स्वच्छता ठेवा, व्यवस्थित करून घ्या ना सगळं असं म्हणत अजित पवारांनी मंदिरातील सदस्यांना सांगितलं आहे.

मी एका पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष आहे. कुठेही बाईट देणार नाही. बैठक झाली की नाही प्रत्येक गोष्ट तुम्हाला सांगितली पाहिजे असं नाही. आम्हाला जेवढ्या गोष्टी तुम्हाला सांगायच्या असतात तेवढ्या प्रेस कॉन्फरन्स घेऊन आम्ही सांगत असतो ते आमचं कर्तव्य आहे. सगळ्या गोष्टी प्रेसला सांगून ती माहिती सगळीकडे देण्याचं काही कारण नाही. काही गोष्टी अशा असतात की, त्या आमच्या अंतर्गत चर्चा असतात असंही अजित पवार म्हणालेत. तर कर्जत बारामती विधानसभा निवडणुकीवर विचारल्यावर तुम्ही काही पण चर्चा कराल त्या प्रत्येकाला उत्तर द्यायला मी बांधील नाही असं अजित पवारांनी म्हटलं आहे. अजित पवार यांच्या उपस्थितीत पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसची महत्त्वाची बैठक पार पडल्याची माहिती आहे. या बैठकीला प्रफुल पटेल, नवाब मलिक, छगन भुजबळ, शिवाजीराव गर्जे, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे उपस्थित असल्याची माहिती आहे. अजित पवार यांच्यासह त्यांच्या पक्षाचे बडे नेते पुण्यात आहेत. अजित पवार यांच्या पुण्यातील जिजाई निवासस्थानी बैठक झाली असल्याची माहिती आहे. या बैठकीला अजित पवार , प्रफुल पटेल, नवाब मलिक, छगन भुजबळ, सुनील तटकरे, शिवाजीराव गर्जे आणि इतर नेते उपस्थित होते. या बैठकीत राज्यपाल नियुक्त विधानपरिषदेचे 12 आमदार त्यामध्ये कोणती नावं द्यायची याबाबत चर्चा होण्याची शक्यता आहे. याशिवाय विधानसभेचं जागावाटप यावर महत्वाची चर्चा सुरु आहे. महायुतीत किती जागांवर दावा करायचा यावरही निर्णय होण्याची शक्यता असल्याची माहिती मिळाली आहे.


# नागपुरात एम्सचेही डॉक्टर संपावर

## डॉक्टरांनी रॅली काढून केला कोलकाताच्या घटनेचा निषेध

प्रतिनिधी
■ नागपूर

कोलकात्याच्या आरजी कर हॉस्पिटल आणि मेडिकलकॉलेजमध्ये एका प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवर सामुहिक अत्याचार करून तिचा खून केला. या प्रकरणावरून डॉक्टरांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. राज्यातील प्रशिक्षणार्थी निवासी डॉक्टरांनी संप सुरू केला आहे. नागपुरातील मेयो, मेडिकलमधील डॉक्टर संपावर असतानाच आता एम्स नागपूरच्या कनिष्ठ आणि वरिष्ठ आंतरवासीता निवासी डॉक्टरांनी संघटना स्थापन करीत संपात सहभागी झाले आहेत. यामुळे नागपुरात रूग्णसेवेवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. संपकाळात आपत्कालीन सेवा आणि आयसीयू नेहमीप्रमाणे कार्यरत राहिल असे एम्सच्या संघटनेने कळवले आहे.

शुक्रवार १६ ऑगस्टपासून



राज्यातील राज्यातील वरिष्ठ निवासी, शिकाऊ डॉक्टर्सही संपावर गेले आहे. यासंदर्भात महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर, मार्डने घेतलेल्या भूमिकेला आमचा पाठिंबा असल्याचे संघटनेने कळवले आहे. समस्या, मागण्यांचे निराकरण न झाल्यास, सर्व बंधपत्रित, ज्येष्ठ रहिवासी १६ ऑगस्टपासून वैकल्पिक सेवांमध्ये काम करणे थांबवतील असे पत्र दिले आहे.

केंद्रीय प्राधिकरणाकडून या गुन्ह्याचा निःपक्षपाती, पारदर्शक तपास करावा, आंदोलक सहकाऱ्यांवर पोलिसांकडून अत्याचार केला जाणार नाही याची हमी, केंद्रीय आरोग्य सेवा संरक्षण कायद्याची अंमलबजावणी करावी, सुरक्षा उपायांत सुधारणा करीत सुरक्षा परिषदेची स्थापना करून, नवीन सुरक्षा ऑडिट, सुप्रशिक्षित आणि सुसज्ज सुरक्षा कर्मचाऱ्यांची भरती, संपूर्ण कॅम्पसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, ऑन-कॉल रूम आणि दर्जेदार वसतिगृहांची तरतूद करावी, पुरुष, महिला निवासी डॉक्टरांसाठी समर्पित ऑन-कॉल रूमचे वाटप, निवासी डॉक्टरांच्या वसतिगृहाच्या प्रलंबित समस्यांचे निराकरण, जवळच्या हॉस्पिटल/कॉलेजमध्ये दारू/पदार्थ विक्रीवर बंदी घालणे, राजकीय सामाजिक कार्यकर्त्यांचा हस्तक्षेप मर्यादित करणे, कॅम्पसच्या आत पोलिस चौकी नियमित पोलिस गस्त घालावी आदी मागण्या केल्या आहे.


## व्हीव्हीएस लक्ष्मण एनसीएच्या प्रमुखपदी राहणार

**बंगुळुरू :** भारताचे माजी फलंदाज व्हीव्हीएस लक्ष्मण राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे प्रमुख राहतील. त्यांचा कार्यकाळ एक वर्षासाठी वाढवण्यात येणार आहे. लक्ष्मण यांचा तीन वर्षांचा करार पुढील महिन्यात सप्टेंबरमध्ये संपत आहे. याआधी असे बोलले जात होते की पुढील वर्षीच्या आयपीएल हंगामासाठी ते फ्रँचायझीचे मुख्य प्रशिक्षक बनू शकतात.या सर्व शक्यता फेटाळून लावत लक्ष्मण यांनी एनसीए प्रमुखपदाचा कार्यकाळ वाढवण्याचा प्रस्ताव मान्य केला आहे. त्यांच्यासोबत त्यांचे सहकारी सितांशु कोटक, साईराज बहुतुले आणि हृषीकेश कानिटकर यांचाही कार्यकाळ वाढवण्यात येणार आहे.लक्ष्मण बीसीसीआयचे अध्यक्ष असताना सौरव गांगुली यांनी २०२१ मध्ये एनसीएची कमान सोपवली होती.लक्ष्मणच्या आधी राहुल द्रविडकडे एनसीएची जबाबदारी होती. २०२१ मध्ये द्रविडला टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक बनवल्यानंतर एनसीएची जबाबदारी लक्ष्मणकडे सोपवण्यात आली. NCA मधील तिच्या पहिल्या तीन वर्षांच्या कार्यकाळात, लक्ष्मण यांनी महिला क्रिकेटसाठी व्यवस्थापन, खेळाडूंचे पुनर्वसन, प्रशिक्षक कार्यक्रम आणि वरिष्ठ संघ-ज्युनियर संघांसह एक उत्कृष्ट रोडमॅप तयार केला आहे.



## इशान किशनची बॅट तळपली!

### बूची बाबू स्पर्धेत दणदणीत शतक



**वृत्तसंस्था**
■ **तिरुनेलवेल्ली**


भारतीय क्रिकेट संघाचा यष्टीरक्षक-फलंदाज इशान किशन गेल्या बऱ्याच काळापासून टीम इंडियातून बाहेर आहे. सध्या इशान बुची बाबू क्रिकेट स्पर्धेत खेळत असून झारखंड संघाचा कर्णधार आहे. या स्पर्धेत त्याने मध्य प्रदेशविरुद्ध पहिल्या डावात जबरदस्त खेळी करत शानदार शतक झळकावले. इशानचे शतक आणखी खास ठरले कारण त्याच्या संघातील इतर कोणत्याही फलंदाजाला अर्धशतकही करता आले नाही. टीम इंडियात पुनरागमन करण्यासाठी इशानसाठी ही स्पर्धा महत्त्वाची असणार आहे आणि सुरूवातीलाच त्याने शतकी कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

तामिळनाडूच्या तिरुनेलवेल्लीत सुरु झालेल्या बूची बाबू चषक लढतीत झारखंडविरुद्ध मध्य प्रदेश सामन्यात प्रथम फलंदाजी करताना मध्य प्रदेश संघ २२५ धावा करत ऑल आऊट झाला. ९१.३ षटकांमध्ये मध्य प्रदेशकडून शुभम कुशवाहाने सर्वाधिक ८६ धावांची खेळी खेळली. तर अरहम अकीलने ५७ धावा केल्या. याशिवाय अन्य कोणत्याही फलंदाजाला मोठी धावसंख्या करता आली नाही. यानंतर झारखंडकडून इशान किशनने एक जबरदस्त खेळी केली. इशान किशनशिवाय या संघातील अन्य कोणताही फलंदाज चांगली खेळी करू शकला नाही. इशान किशनने आपल्या आक्रमक शैलीत फलंदाजी करत अवघ्या ८६ चेंडूत शतक झळकावले. इशानने आपले शतक पूर्ण केले तोपर्यंत संघाने २२५ हून अधिक धावा केल्या होत्या. म्हणजे यासह संघाने आघाडी घेतली होती. इशान किशनने लागोपाठ दोन षटकार मारत आपले शतक पूर्ण केले.

## WTC फायनल खेळण्यासाठी भारताला 7 विजयांची गरज

### 10 कसोटी बाकी, यातील 5 ऑस्ट्रेलियाविरुद्ध; न्यूझीलंडचेही आव्हान





**वृत्तसंस्था**
■ **लंडन**

श्रीलंका दौऱ्यानंतर टीम इंडिया १८ सप्टेंबरपर्यंत कोणतेही आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणार नाही. भारताला १९ सप्टेंबरपासून पुढील वर्षी चॅम्पियन्स ट्रॉफीपर्यंत सतत क्रिकेट खेळायचे आहे. यानंतर आयपीएल आणि त्यानंतर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप खेळली जाईल. भारत सध्या WTC फायनलमध्ये पोहोचण्याचा सर्वात मोठा दावेदार आहे. पण त्यासाठी संघाला पुढील १० पैकी ७ कसोटी जिंकाव्या लागतील. यामध्ये न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियासारखे संघ भारताच्या अडचणी वाढवू शकतात. या २ संघांविरुद्ध भारत WTC च्या शेवटच्या २ फायनलमध्ये हरला होता.

जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत (वतच) मध्ये, संघांना विजयासाठी १२ गुण, ड्रॉसाठी ४ आणि पराभवासाठी कोणतेही गुण मिळत नाहीत. तर बरोबरी झाल्यास दोन्ही संघांना ६ -६ गुण मिळतात. एका संघाला २ वर्षांच्या चक्रात ६ मालिका खेळायच्या असतात, परंतु प्रत्येक संघाच्या मालिकेतील सामन्यांची संख्या निश्चित नसते. काही मालिकांमध्ये २ टेस्ट आणि काहींमध्ये ५ टेस्ट असू शकतात.अशा स्थितीत एकूण गुणांच्या आधारे क्रमवारी लावली असती तर ज्या संघांनी ५ कसोटी मालिका खेळल्या त्यांना अधिक फायदा झाला असता. ही परिस्थिती टाळण्यासाठी आयसीसीने रँकिंगसाठी टक्केवारी गुणांना महत्त्व दिले आणि त्या आधारे रँक ठरवण्याचा निर्णयही घेतला. टक्केवारीमुळे कमी गुण असूनही भारत सध्या ऑस्ट्रेलियापेक्षा पुढे आहे.

WTC च्या या चक्रात भारताने ३ मालिका खेळल्या. वेस्ट इंडिजचा १ -० ने पराभव केला, परंतु मालिकेत कसोटी अनिर्णित राहिली. दक्षिण आफ्रिकेतील २-कसोटी मालिका १ -१ अशी बरोबरीत सुटली, त्यानंतर त्यांनी घरच्या मैदानावर इंग्लंडविरुद्ध एक कसोटी गमावली, पण मालिका ४ -१ ने जिंकली. भारताने इंग्लंड आणि वेस्ट इंडिजविरुद्ध २ कसोटी सामने जिंकण्याची संधी गमावली. टीम इंडियाचे सध्या ६ विजय आणि २ पराभवानंतर ७४ गुण आहेत. संघ सध्या ६८.५१ % गुणांसह अव्वल आहे. सर्व टेस्ट संपल्यानंतर भारताने समान टक्केवारी राखण्यात यश मिळवले तर ते अंतिम फेरीत पोहोचेल. कारण गेल्या वेळी भारताने ५८.८० % आणि ऑस्ट्रेलियाने ६६.६७ % गुणांसह फायनलमध्ये प्रवेश केला होता. अशा परिस्थितीत, ६५ % पेक्षा जास्त गुण ठेवणे या क्षणी सुरक्षित स्थान मानले जाऊ शकते.

***ऑस्ट्रेलियाचे मोठे आव्हान***

*भारताला आता बांगलादेश, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध तीन कसोटी मालिका खेळायच्या आहेत. बांगलादेशसोबत २ आणि न्यूझीलंडसोबत ३ कसोटी भारतातच होणार आहेत. घरच्या परिस्थितीत, भारताने गेल्या १२ वर्षात एकही मालिका गमावलेली नाही, त्यातही भारताने केवळ ४ कसोटी गमावल्या आहेत. अशा परिस्थितीत टीम इंडिया न्यूझीलंड आणि बांगलादेशविरुद्धच्या पाचही कसोटी जिंकू शकते. भारताने पाचही कसोटी जिंकल्या तर संघ १३४ गुण आणि ७९.७६ % गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर राहील.घरच्या मालिकेनंतर भारत डिसेंबरमध्ये ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर जाणार असून, तेथे ५ कसोटी सामने होतील. संघाने येथे शेवटच्या २ कसोटी मालिका जिंकली असली तरी ऑस्ट्रेलियाचा फॉर्म पाहता यावेळी अडचणी येऊ शकतात.*

## रोहित, विराटसारख्या मोठ्या खेळाडूंना देशांतर्गत स्पर्धांत खेळवून त्यांच्यावरचा ताण वाढवायचा नाहीय!

### बीसीसीआय सचिव जय शहा यांचे स्पष्टीकरण



**वृत्तसंस्था**
■ **नवी दिल्ली**

बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी रोहित आणि विराट हे दोन खेळाडू दुलीप ट्रॉफीमध्ये का खेळत नाहीत याचे स्पष्टीकरण दिले. एका इंग्रजी दैनिकाशी बोलताना ते म्हणाले की, विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळवून त्यांच्यावर कामाचा ताण वाढवण्यात काही अर्थ नाही. त्यामुळे या खेळाडूंना दुखापत होण्याचा धोका आहे. आता जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेची फायनल गाठण्याचा मोठा टास्क टीम इंडियापुढे असल्यामुळे बीसीसीआयने मोठ्या खेळांडूवर स्थगणिक स्पर्धांत खेळण्याची सक्ती न करण्याचा निर्णय घेतल्याचे शहा म्हणाले.

रोहित शर्मा आणि विराट कोहली देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळणार असल्याच्या चर्चा काही दिवसांपासून सुरू होत्या. पण दुलीप ट्रॉफी स्पर्धेसाठी काल जाहीर झालेल्या संघांमधून मात्र या दोन खेळाडूंची नावे गायब होती. मात्र आता रोहित शर्मा आणि विराट कोहली दुलीप ट्रॉफीमध्ये का खेळणार नाही. याबाबत बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी स्पष्टीकरण करीत या विषयाला पूर्णविराम दिला आहे.

यावेळी दुलीप करंडक स्पर्धा झोनल फॉरमॅटमध्ये खेळवली जाणार नाही. यासाठी ए, बी, सी आणि डी या नावांनी संघ जाहीर करण्यात आले आहेत. चारही संघात अनेक दिग्गज खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. अ संघाचा कर्णधार शुभमन गिल, ब संघाचा कर्णधार अभिमन्यू ईश्वरन, क संघाचा कर्णधार ऋतुराज गायकवाड आणि ड संघाचे कर्णधारपद श्रेयस अय्यरकडे सोपवण्यात आले आहे.

शुभमन गिलच्या अ संघात मयंक अग्रवाल, रायन पराग, केएल राहुल, ध्रुव जुरेल, तिलक वर्मा, शिवम दुबे आणि कुलदीप यादवसारखे खेळाडू आहेत. यशस्वी जैस्वाल, सरफराज खान, ऋषभ पंत, मोहम्मद सिराज, रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर या खेळाडूंचा अभिमन्यू इसवरनच्या ब संघात समावेश करण्यात आला आहे. रजत पाटीदार, सूर्यकुमार यादव, मयंक मार्कंडे आणि उमरान मलिक या खेळाडूंचा गायकवाडच्या सी संघात समावेश करण्यात आला आहे. तर देवदत्त पडिक्कल, इशान किशन, अक्षर पटेल आणि हर्षित राणा या खेळाडूंचा श्रेयस अय्यरच्या संघात समावेश करण्यात आला आहे.

## सर्वधर्मीय मान्यवरांच्या हस्ते डॉ नरेंद्र दाभोलकरांच्या पुस्तिकांचे प्रकाशन

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा विरोध कुठल्याही एका जाती धर्माला नसून त्या जातीतील अनिष्ट रूढी परंपरा च्या माध्यमातून होणाऱ्या शोषणाला आहे, असे मत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारणी सदस्य प्रा. प्रवीण देशमुख यांनी व्यक्त केले.

"डॉ नरेंद्र दाभोळकराचे विचार घरोघरी" या उपक्रमाच्या अंतर्गत विविध विषयांच्या पुस्तिका प्रकाशनाच्या निमित्ताने ते बोलत होते.येत्या २० ऑगस्ट ला शहीद डॉ नरेंद्र दाभोलकर यांच्या खूनाला ११ वर्षे पूर्ण होत आहे. यानिमित्त त्यांच्या विचारांचा जागर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये व्हावा याकरिता वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून शहीद डॉ नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त पंधरा पुस्तिकांचे प्रकाशन हे स्थानिक पातळीवरील मान्यवरांच्या हस्ते प्रत्येक जिल्ह्यामध्ये करण्यात येत आहे.काल कल्याण येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी सरचिटणीस नोवेल साळवे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने कल्याण मधील चर्चचे फादर सायमन डिसोजा आणि कल्याणच्या वक्फ बोर्डाचे सदस्य मेहमूद शेख यांच्या हस्ते या पुस्तीकांचे प्रकाशन करण्यात आले



येत्या २० तारखेला सकाळी ' निर्भय मॉर्निंग वॉक' चे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर विविध शाळांमध्ये जाऊन वैज्ञानिक दृष्टिकोनावरती विद्यार्थ्यांकरिता कार्यक्रम घेण्यात येणार असल्याचे ठाणे जिल्हा सचिव अश्विनीताई माने यांनी उपस्थित त्यांना सांगितले.

विविध धर्मांच्या लोकांनी एकत्र येत डॉक्टर नरेंद्र दाभोलकरांच्या या पुस्तिकांचं प्रकाशन करणे , या कृतीने डॉ नरेंद्र दाभोळकरांच्या विचारांची व्याप्ती किती मोठी आहेत याची प्रचिती येते. अशा भावना अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे विश्वस्त गणेश चिंचोले यांनी व्यक्त केल्या. ठाणे जिल्हा अध्यक्ष डी जे वाघमारे यांनी आपले विचार व्यक्त केले.

## नगर पथविक्रेता समिती निवडणूक इच्छुक उमेदवारांसाठी मार्गदर्शन शिबिर संपन्न

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

नगर पथविक्रेता (फेरीवाला) समितीची निवडणूक २९ ऑगस्ट २०२४ रोजी होणार असून यासाठी ५ आणि ६ ऑगस्ट २०२४ रोजी नामनिर्देशन पत्र वाटपाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. ही नामनिर्देशन पत्रे कशी भरावयाची, कोणती कागदपत्रे जोडावयाची याबाबत इच्छुक उमेदवारांसाठी प्रमुख नगर पथविक्रेता समिती निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यामार्फत मार्गदर्शन शिबीर नुकतेच घेण्यात आले. त्यात ४३ इच्छुक उमेदवारांनी सहभाग घेतला.

केंद्र शासनाच्या पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम-२०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम -२०१६ मधील तरतुदींच्या अनुषंगाने नगर परिषद प्रशासन संचालनालयाचे आयुक्त तथा संचालक तसेच समन्वयन अधिकारी (फेरीवाला धोरण) यांच्या निर्देशांनुसार, नगर पथविक्रेता समिती गठीत करण्यात येणार आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात १ शिखर समिती आणि ७ परिमंडळाच्या प्रत्येकी एक याप्रमाणे (७ समिती) एकूण ८ समित्यांसाठी निवडणूक होणार आहे. प्रत्येक समितीतील सदस्यांची एकूण संख्या ८ आहे. यामध्ये अनुसूचित जाती (१), अनुसूचित जमाती (१), अल्पसंख्याक (१), इतर मागासवर्ग (१), दिव्यांग (१) आणि खुला (३) या प्रवर्गांनुसार सदस्य रचना निश्चित करण्यात आली आहे. यापैकी एक तृतियांश म्हणजेच ३ जागा प्रत्येक समितीत महिलांसाठी आरक्षित आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नोंदणीकृत नगर पथविक्रेता मतदारांची एकूण संख्या ३२ हजार ४१५ आहे.

प्राप्त नामनिर्देशन पत्राची छानणी १४ ऑगस्ट २०२४ (सकाळी ११ ते प्रक्रिया संपेपर्यंत) करण्यात येणार आहे. प्राप्त नामनिर्देशन पत्राची यादी १६ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. प्रत्यक्ष मतदान २९ ऑगस्ट २०२४ (सकाळी ७ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत) रोजी तर त्याच दिवशी म्हणजे २९ ऑगस्ट २०२४ सायंकाळी ५ वाजेनंतर मतमोजणी प्रक्रिया सुरू होईल. निवडणूक निकाल २९ ऑगस्ट २०२४ रोजी मतमोजणीनंतर जाहीर करण्यात येणार आहे.

## रे रोड स्मशानभूमीची विद्युतदाहिनी 15 दिवस तात्पुरती बंद

**मुंबई:** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ई विभागातील हिंदू वैकुंठधाम स्मशानभूमीतील विद्युतदाहिनीच्या तांत्रिक दुरूस्तीचे आणि परिरक्षणाचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे १७ ऑगस्ट २०२४ ते ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत विद्युतदाहिनीची सेवा बंद राहील. विद्युतदाहिनीशी संबंधित कामे पूर्ण झाल्यानंतर ही विद्युतदाहिनी नागरिकांच्या सेवेत पुन्हा उपलब्ध करून देण्यात येईल. मात्र, याठिकाणी असणारी पारंपरिक पद्धतीची अंत्यविधी सेवा कार्यरत आहे, असे ब पालिकेच्या 'ई' विभागातील वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्याद्वारे कळविण्यात आले आहे.

याऐवजी नजीकच्या चंदनवाडी, वरळी येथील स्मशानभूमीतील विद्युत दाहिनीचा पर्याय या कालावधीत उपलब्ध असेल, असेही 'ई विभाग' कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

## पावसाळ्यातील चिकनगुनिया, एच1 एन1 आजार वाढले

### पालिकेचे खबरदारी घेण्याचे नागरिकांना आवाहन

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबईत गतवर्षीपेक्षा यंदा ऑगस्ट महिन्यात पावसाळी आजारांच्या रुग्ण संख्येत वाढ झाली आहे. लेप्टोस्पायरोसिस, मलेरिया, चिकुनगुनिया आणि H1N1आदींबाबत नागरिकांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन पालिकेच्या आरोग्य विभागाने मुंबईकरांना केले आहे.

आरोग्य विभागाने गुरुवारी याबाबत आकडेवारी जाहीर केली. त्यानुसार गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात H1N1,फ्लूचे ११६ रुग्ण आढळले होते. तर, यंदा ऑगस्टच्या पहिल्या पंधरवड्यातच या आजाराच्या ११९ रुग्ण आढलून आले आहे.गतवर्षी चिकुनगुनियाचे ३५ रुग्ण मुंबईत आढळले होते. तर, यंदा ऑगस्टच्या १४ तारखेपर्यंतच ८४ रुग्णांची नोंद करण्यात झाली आहे.

मुंबईत गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये गॅस्ट्रोचे ९७८ रुग्ण नोंदले गेले होते. यंदा १४ तारखेपर्यंत हा आकडा ५३४ वर पोहचला आहे.गतवर्षी मलेरियाचे १०८० रुग्ण होते तर यंदा ऑगस्टच्या १४ तारखेपर्यंत मलेरियाचे ५५५ , गत वर्षी डेंग्यूचे ९९९ रुग्ण आढळून आले होते यंदा ५६२, लेप्टोस्पायरोसिसचे ३०१ होते यंदा १७२, हिपेटायटिस ए आणि इ या प्रकारांचे गेल्यावर्षी १०३ रुग्ण होते यंदा ७२ रुग्ण नोंदले गेले आहेत.

चिकुनगुनिया, डेंग्यू या आजारांच्या प्रसारासाठी एडिस प्रजातीचे डास कारणीभूत ठरतात. साचून राहिलेल्या स्वच्छ पाण्यात या डासांची उत्पत्ती होते. त्यामुळे नागरिकांनी आपल्या घरात आणि परिसरात पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन पालिकेने केले आहे.

## ग्रंथपाल दिनानिमित्त सीएसएमटी येथील ग्रंथालयात 17 हजाराहून अधिक पुस्तके



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

भारतातील 'ग्रंथालय विज्ञानाचे जनक' म्हणून ओळखले जाणारे महान ग्रंथपाल आणि गणितज्ञ पद्मश्री श्री एस आर रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त मध्य रेल्वे तर्फे दरवर्षी १२ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा केला जातो. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील मध्या रेल्वेच्या ग्रंथालयात नियतकालिकांसह १७,००० हून अधिक पुस्तकांचा संग्रह आहे.या मध्य रेल्वेच्या ग्रंथालयाची सुरुवात १९८४ मध्ये काहीशे पुस्तकांनी झाली. कर्मचाऱ्यांमध्ये वाचनाची सवय लागावी आणि त्यांच्या ज्ञानाचा विस्तार व्हावा, या उद्देशाने ग्रंथालय सुरू झाले.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या युनेस्कोच्या जागतिक वारसा इमारतीच्या तळमजल्यावर असलेल्या ग्रंथालयात विविध विषयांवरील पुस्तके आहेत. काल्पनिक, नॉन फिक्शन, साहित्य, चरित्रे आणि इंग्रजी, हिंदी आणि मराठी भाषेतील विविध विषयांवरील पुस्तके आहेत. यात प्रेमचंद, आर के नारायण, एनिड ब्लायटन, अगाथा क्रिस्टी, अमिष त्रिपाठी, चेतन भगत, तरला दलाल, श्रीमती सुधा मूर्ती, रॉबिन शर्मा आणि यांसारख्या इतर अनेक प्रसिद्ध लेखक आणि प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांच्या पुस्तकांचा समावेश आहे.

वाचनासाठी पुरेशी जागा आणि दरमहा रु.५०/- नाममात्र सदस्य शुल्क असलेले मध्य रेल्वेचे ग्रंथालय मध्य रेल्वेच्या हजारो कर्मचारी सदस्यांना सेवा देते त्यांना आवारात वाचण्याची किंवा त्यांच्या सोयीनुसार पुस्तके वाचण्यासाठी घरी नेण्याची परवानगी आहे. इंटरनेट, व्हॉट्सॲप, टेलिग्राम आणि सोशल मीडिया यांसारख्या तीव्र स्पर्धेच्या तोंडावर मध्य रेल्वे वाचनालय पुस्तक आणि वाचनाद्वारे ज्ञान आणि माहिती मिळविण्याची परंपरागत संकल्पना जिवंत ठेवण्याच्या आपल्या वचनबद्धतेवर ठाम असल्याचा विश्वास मध्य रेल्वेने व्यक्त केला आहे.

## भरारी प्रकाशनचा 300 व्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा संपन्न

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

भरारी प्रकाशन निर्मित ३०० व्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा १४ ऑगस्ट रोजी संध्याकाळी विलेपार्ले येथील उत्कर्ष मंडळ येथे पार पडला. लता गुठे लिखित 'स्वातंत्र्यसंग्रामातील विरांगना' आणि स्मिता भागवत लिखित 'संचित संस्कृतीचे' या पुस्तकांचे प्रकाशन एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांच्या हस्ते झाले.




यावेळी व्यासपीठावर माध्यम सल्लागार जयु भाटकर, आमदार पराग अळवणी, भारत विकास परिषद विलेपार्लेचे अध्यक्ष अविनाश धर्माधिकारी, ज्येष्ठ साहित्यिका माधवी कुंटे उपस्थित होत्या.

पुस्तक प्रकाशनाच्या आधी 'जगणं आमचं' गप्पांचा कार्यक्रम घेण्यात झाला. यामध्ये प्रकाशिका लेखिका लता गुठे, वीरमाता अनुराधा गोरे आणि सीनियर इन्स्पेक्टर रेणुका बुवा यांचा सहभाग होता. यावेळी जयु भटकर यांनी विचारलेल्या प्रश्नांतून तिघींचाही थोडक्यात पण मुद्देसूद आयुष्याचा प्रवास उलगडला गेला. त्यानंतर प्रकाशनाचा कार्यक्रम सोहळा पार पडला.

याप्रसंगी एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये अतिशय सुरेख मार्गदर्शन केले. लता गुठे यांनी लिहिलेल्या पुस्तकाचेही कौतुक केले आणि हे पुस्तक किती महत्त्वाचे आहे हेही त्यांनी आवर्जून सांगितले. जयु भाटकर यांनी स्मिता भागवत लिखित 'संचित संस्कृतीचे' व लता गुठे लिखित 'स्वातंत्र्यसंग्रामातील विरांगना' या दोन्हीही पुस्तकावर छान विवेचन केले. आमदार पराग अळवणी यांनी आपले मनोगत व्यक्त.केले, लता गुठे ह्या गेली सात वर्षे सातत्याने एक सामाजिक जबाबदारी या उद्देशाने प्रत्येक वर्षी 15 ऑगस्टला क्रांतिवीरांच्या कार्यावर आधारित पुस्तक प्रकाशित करत आहेत. अविनाश धर्माधिकारी यांनी भारत विकास परिषदेच्या वाटचालीबद्दल माहिती दिली. स्वातंत्र्यसंग्रामातील विरांगना या पुस्तकातील एका व्यक्तिरेखेचे अभिवाचन संपदा पाटगावकर यांनी केले तर सूत्रसंचालन स्मिता आपटे यांनी केले.

## स्वातंत्र्यदिनी वरळीत शिवसेनेकडून विवीध उपक्रम; दिव्यांगाना व्हील चेअरचेही वाटप

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

वरळीत शिवसेनेच्या वतीने ५ दिव्यांगांना व्हील चेअर चे वाटप आमदार यामिनी जाधव यांच्या उपस्थितीत करण्यात आले. शिवसेना प्रवक्त्या ॲड. सुशीबेन शाह यांनी दिव्यांग व्यक्तींना मदतीचा हात पुढे केला. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून वरळी विधानसभेत दिव्यांग बालक व व्यक्तींना व्हीलचेअर वाटप केले.



परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.यावेळी महिलांसाठी 'होम मिनिस्टर खेळ पैठणीचा' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महिलांनी त्याचा भरपूर आनंद घेतला. तसेच मोफत आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, कृत्रिम अवयव वाटप नोंदणी असे अनेक कार्यक्रम दिवसभर विभागातील नागरिकांसाठी राबविण्यात आले.

महिलांना सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना राबविली जात आहे. याचा सर्वाधिक महिलांनी लाभ घ्यावा. तसेच वरळी विभागातील महिला, बालक, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक यांच्या समस्या सोडवणे हे आपले कर्तव्य आहे, असे महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा व शिवसेना प्रवक्त्या ॲड. सुशीबेन शाह यांनी सांगितले. याप्रसंगी, शिवसेना आमदार यामिनी जाधव, माजी नगरसेवक संतोष खरात, युवा नेता निखिल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

## काँग्रेसतर्फे वर्सोवा विधानसभेत भव्य तिरंगा स्वाभिमान यात्रा निघाली

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबई काँग्रेसचे सरचिटणीस आणि उत्तर भारतीय सेलचे कार्याध्यक्ष एड अवनीश तीर्थराज सिंह म्हणाले की, समाजात बंधुभाव वाढवणे हे आपल्या सर्वांचे ध्येय असले पाहिजे, देशाचे सौंदर्य परस्पर बंधुभावात आहे. ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त वर्सोवा विधानसभेत अवनीश तीर्थराज सिंह यांनी काढलेल्या भव्य तिरंगा स्वाभिमान यात्रेत सिंह म्हणाले की, स्वातंत्र्यलढ्यात बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी तिरंगा स्वाभिमान यात्रा काढण्यात आली. तिरंगा स्वाभिमान यात्रेत राष्ट्रवादाचे प्रेम उपजत आहे,



त्यातून राष्ट्रवादाची भावना जागृत होते. तिरंगा हा आपला सन्मान, आदर आणि प्रत्येक भारतीयाचा स्वाभिमान आहे. एकता आणि अखंडतेचे प्रतीक असलेला तिरंगा आपल्याला प्राणापेक्षाही प्रिय आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी देशवासीयांना राष्ट्रवादाची जाणीव करून देणे ही आपली जबाबदारी असल्याचे ते म्हणाले. देश तोडणाऱ्यांना घाबरायचे नाही तर त्यांच्याशी धैर्याने लढायचे आहे. सिंह म्हणाले की, मी समाजातील प्रत्येक घटकाच्या पाठीशी उभा आहे, एकमेकांना सोबत घेऊन पुढे जाण्याचा संकल्प हा या प्रवासाचा उद्देश आहे. बेहरामबाग नाका येथील गांधी शाळेजवळून निघालेल्या तिरंगा स्वाभिमान यात्रेत हजारो तरुणांनी सहभाग घेऊन हातात तिरंगा ध्वज घेऊन काजूपाडा सर्कल, आनंद नगर, मेगा मॉल, बीएमसी कॉलनी, ओशिवरा मेट्रो स्टेशन मार्गे जेएमएस बिल्डिंगजवळ समारोप केला.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास
WOMEN & CHILD DEVELOPMENT



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

पर्व महिला सक्षमीकरणाचे

मुख्यमंत्री
# माझी लाडकी बहीण
योजना

जुलै व ऑगस्ट महिन्याचे एकूण
**रु.३०००**
पात्र महिलांच्या खात्यात जमा !

# शुभारंभ सोहळा

**शुभहस्ते**

**एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री

**मुरलीधर मोहोळ**
केंद्रीय राज्यमंत्री

**प्रमुख उपस्थिती**

**देवेंद्र फडणवीस**
उपमुख्यमंत्री

**अजित पवार**
उपमुख्यमंत्री तथा
पालकमंत्री पुणे जिल्हा

**चंद्रकांत (दादा) पाटील**
मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण

**दिलीप वळसे-पाटील**
मंत्री, सहकार

**डॉ. नीलम गोऱ्हे**
उपसभापती, विधान परिषद

**निमंत्रक**

**आदिती तटकरे**
मंत्री, महिला व बालविकास

• दिनांक व वेळ •
शनिवार दि. १७ ऑगस्ट, २०२४ रोजी, दु. १२.३० वा.

• कार्यक्रम स्थळ •
श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बॅडमिंटन हॉल,
बालेवाडी, पुणे

अधिक माहितीसाठी हेल्पलाइन नंबर : १८१
संकेतस्थळ : https://ladakibahin.maharashtra.gov.in/



देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

आदिती तटकरे
मंत्री, महिला व बाल विकास

डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/सी २०९५

**महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन**